पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १६ • अंक १६ • बुधवार, दि. २२ जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper:citynewssuperfast.com

**सुविचार**

आयुष्यात मोठं व्हायचं असेल तर परिस्थितीची तक्रार करण्यापेक्षा परिस्थिती बदलण्याची तयारी ठेवा.





## »थोडक्यात

### दिल्लीतील १६ मेट्रो स्टेशन बंद

**नवी दिल्ली :** जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या 'कॉकरोच जनता पार्टी'च्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, सरकारने दुसऱ्यांदा चर्चेचा प्रस्ताव दिला आहे. ण्व्झ् चे प्रवक्ते आशुतोष रांका यांनी याला दुजोरा दिला असून, या प्रस्तावावरील निर्णय मुख्य समितीशी (कोअर टीम) चर्चा केल्यानंतर घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, सुरक्षेच्या कारणास्तव दिल्लीतील १६ मेट्रो स्थानके बंद करण्यात आली आहेत. ण्व्झ् च्या आंदोलनाचा आज ३३ वा दिवस असून, बुधवार सकाळपासूनच हजारो आंदोलक घटनास्थळी जमले आहेत. यामध्ये २० जुलै रोजी झालेल्या 'संसद मोर्चा'दरम्यान पोलिसांचा लाठीचार्ज आणि अश्रूधुराच्या नळकांड्यांचा सामना करावा लागलेल्या व्यक्तींचाही समावेश आहे. दुसरीकडे, संसद मोर्चादरम्यान झालेल्या हिंसाचाराबाबत दिल्ली पोलिसांनी विविध पोलीस ठाण्यांमध्ये १० एफआयआर दाखल केले आहेत. आंदोलकांवर आरएएफ जवानांवर जीवघेणे हल्ले करणे, दगडफेक, तोडफोड आणि सरकारी कामात अडथळा आणणे यांसारखे आरोप ठेवण्यात आले आहेत.

# शरद पवार-सुप्रिया सुळेंनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट!





प्रतिनिधी २२ जुलै

**नवी दिल्ली :** नवी दिल्लीत राजकीय घडामोडींना वेग आला आहे. कालच जंतरमंतर येथे जाऊन आंदोलक विद्यार्थ्यांची भेट घेणारे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीचे फोटो नुकतेच समोर आले असून, राजकीय वर्तुळात या बैठकीची चर्चा सुरू झाली आहे.

दिल्लीतील जंतरमंतरवर गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असून, महाराष्ट्रातील विविध राजकीय नेत्यांनी या आंदोलनाला भेट देऊन पाठिंबा दर्शवला आहे.



'विद्यार्थ्यांच्या सन्मानासाठी, विरोधी पक्ष मैदानात': NEET घोटाळ्याविरोधात संसद परिसरात घुमला विद्यार्थ्यांचा आवाज; काळे कपडे परिधान करून विरोधी खासदारांचे शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी करत जोरदार आंदोलन.

काल शरद पवार यांनीही स्वतः जंतरमंतरवर जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या मागण्या जाणून घेतल्या होत्या.

त्यानंतर लगेचच आज शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतल्याने, या बैठकीत विद्यार्थ्यांच्या आंदोलनाबाबत काही चर्चा झाली का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, या भेटीचे फोटो समोर आले असले तरी, ही भेट जंतरमंतरवरील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर झाली की ही केवळ एक सदिच्छा राजकीय भेट होती, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, दिल्लीत सध्या सुरू असलेल्या राजकीय घडामोडी आणि तापलेल्या वातावरणात शरद पवार आणि पंतप्रधान मोदी यांच्यातील ही भेट अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.




## अकोला मनपाचा मोठा निर्णय

# 1,402 कर्मचाऱ्यांना 5 लाखांचे अपघात विमा कवच

### मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त घोषणा; जिल्ह्यातील 929 गावांत 'सेवा जनकल्याण सप्ताह'

प्रतिनिधी २२ जुलै

अकोला : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अकोला महानगरपालिका प्रशासनाने आपल्या अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांसाठी महत्त्वपूर्ण कल्याणकारी योजना जाहीर केली आहे. मनपातील सर्व १,४०२ कर्मचाऱ्यांना ५ लाख रुपयांचे सामूहिक अपघात विमा कवच पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या विम्याचा संपूर्ण प्रीमियम मनपा प्रशासन भरणार आहे.

महाराष्ट्र विधानसभेचे मुख्य प्रतोद आमदार रणधीर सावरकर यांनी एका पत्रकार परिषदेत या निर्णयाची अधिकृत माहिती दिली. यावेळी महापौर शारदा खेडकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांची उपस्थिती होती.

या पत्रकार परिषदेला आमदार रणधीर सावरकर, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार हरीश पिंपळे, आमदार वसंत खंडेलवाल, महापौर शारदा खेडकर, स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल, भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, शहर अध्यक्ष जयंत मसने, प्रसिद्धी प्रमुख गिरीश जोशी यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ९२९ गावांत सामाजिक उपक्रमांची मालिका

» मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त अकोला जिल्ह्यातील ९२९ गावांमध्ये 'सेवा जनकल्याण सप्ताह' आयोजित केला जाणार आहे. भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते, बूथ प्रमुख आणि स्थानिक सामाजिक संस्थांच्या माध्यमातून हा सप्ताह राबवला जाईल.२२ आणि २३ जुलै रोजी शहरी भागात 'किचन गार्डन किट' तर ग्रामीण भागात 'परसबाग किट'चे वाटप केले जाईल. संपूर्ण जिल्ह्यात २५ विविध ठिकाणी रक्तदान शिबिरे, अन्नदान, आरोग्य तपासणी, स्वच्छता अभियान, मातृशक्ती सन्मान आणि शेतकरी सन्मान यांसारखे उपक्रम आयोजित केले आहेत.

### विमा योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये

» **५ लाख रुपयांचे सुरक्षा कवच: अपघाती मृत्यू किंवा कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला ५ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळेल.**

**उपचारासाठी वैद्यकीय मदत: अपघातामुळे होणाऱ्या वैद्यकीय उपचारासाठी २ लाख रुपयांपर्यंतचा खर्च विम्याअंतर्गत कव्हर केला जाईल.**

**पीएनबी कडून २५टक्के सवलत: या योजनेसाठी पंजाब नॅशनल बँकेकडून विम्याच्या प्रीमियमवर २५ टक्के विशेष सवलत मिळवण्यात आली आहे.**

# मनोज जरांगेंचा थेट जंतर मंतरवरुन सरकारला इशारा

वृत्तसंस्था २२ जुलै

**नवीदिल्ली :** नीट परीक्षेतील पेपरफुटीप्रकरणी कॉक्रोच जनता पार्टीकडून दिल्लीतील जंतर मंतरवर आंदोलन सुरू आहे. २० जुलै रोजी झालेल्या 'चलो संसद' रॅलीदरम्यान आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांनी बेछूट लाठीचार्ज केला आणि त्यानंतर परिस्थिती आणखी चिघळली. या आंदोलनाला अनेक राजकीय नेते मंडळींसह, मनोरंजन क्षेत्रातील कलाकारांनी पाठिंबा दिला आहे. 'आमच्या आंदोलनाची पद्धत वेगळी आहे. ते जेव्हा सांगतील, बोलवतील त्यावेळी आम्ही येऊ असा मी शब्द दिला आहे. त्यांनी जर हाक मारली तर मी येणारच, शांततेच्या आंदोलनात किती ताकद आहे आम्ही दाखवून दिल. आपण विद्यार्थी म्हणून या आंदोलनाकडे बघूया. गोरगरीबांची लेकरं देशभरात आहेत. ' असं मनोज



जरांगे पाटील म्हणाले. 'दिल्ली आपल्या देशाची राजधानी आहे. न्याय मिळाला नाही तर आपण राजधानीत येतो. सोनमजी, अभिजीत आंदोलनाला बसलेत. आपल्याला त्यांना साथ दिली पाहिजे. ज्यांना आपण निवडून दिल, त्यांना जाणीव करुन द्यायची गरज आहे. हे भाजपाचे सरकार प्रत्येकवेळी गोरगरिबांच्या लेकरांवर अन्याय करते. यापुढच्या काळात जर विद्यार्थ्यांवर लाठीहल्ला करण्याचा प्रयत्न सरकारने केला, तर राज्यात भाजपच्या नेत्यांना फिरू देणार नाही. यांचा माज उतरवल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही,' असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. अनेक दिग्गज मंडळींनी स्वतः आंदोलनस्थळी उपस्थित राहत विद्यार्थ्यांना समर्थन देण्याची भूमिका बजावली. उद्धव ठाकरे, सुप्रिया सुळे, शरद पवार, अमित ठाकरे, संजय राऊत यांनी जंतरमंतरवर येऊन अभिजीत दिपकेंची भेट घेतली. यानंतर आज मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील दिल्लीत जंतर-मंतरवर पोहोचले आहेत. यावेळी जरांगे यांनी अभिजीत दिपके यांच्यासोबत चर्चा केली आणि त्यानंतर आंदोलकांना जंतर मंतर सोडू नका, असे आवाहन केले. 'आम्ही तुमच्यासोबत आहोत. सरकारला आपण निवडून दिलेलं आहे. आपल्या मायबापाने यांना मतदान केल आहे. आपल्या जिल्ह्याने, तालुक्याने यांना मतदान केल. या पुढच्या काळात तुम्हाला धक्का जरी लागला तर आम्ही तुमच्यासोबत आहोत.

# धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचे पत्र व्हायरल

वृत्तसंस्था २२ जुलै

**नवीदिल्ली :** केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत सोशल मीडियावर एक पत्र मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या पत्रात त्यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री पदाचा राजीनामा दिल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, हा दावा दिशाभूल करणारा असून धर्मेंद्र प्रधान यांनी अद्याप आपल्या पदाचा राजीनामा दिलेला नाही.

सध्या दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर आंदोलन सुरू आहे. आंदोलनकर्त्यांकडून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे.

या आंदोलनादरम्यानच त्यांच्या नावाने कथित राजीनामा पत्र सोशल मीडियावर व्हायरल झाले असून त्यावरून विविध तर्क-वितर्क लढवले जात आहेत. व्हायरल होत असलेल्या पत्रावर २१ जुलै २०२६ ही तारीख असून ते पंतप्रधानांना उद्देशून लिहिल्याचा आभास निर्माण करण्यात आला आहे.

पत्रात वारंवार झालेल्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचा परीक्षापद्धतीवरील विश्वास उडाला असून, त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारत आपण राजीनामा देत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच या अपयशासाठी सरकारच्या नेतृत्वालाही जबाबदार धरल्याचा मजकूर पत्रात आहे. मात्र, या पत्राच्या आधारे धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याची कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रपती भवन किंवा केंद्र सरकारकडूनही अशा कोणत्याही राजीनाम्याची पुष्टी झालेली नाही. धर्मेंद्र प्रधान यांनीही राजीनामा दिल्याचे कोणतेही अधिकृत निवेदन जारी केलेले नाही. यामुळे सोशल मीडियावर फिरणारे हे पत्र बनावट किंवा दिशाभूल करणारे असल्याचे स्पष्ट झाले आहे. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर चुकीची माहिती पसरवून संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# अजितदादांच्या आठवणीने पवार कुटुंब अश्रूंकुल!

## विमान दुर्घटनास्थळी सुनेत्रा पवारांनी वाहिली आदरांजली

प्रतिनिधी २२ जुलै

**बारामती :** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आज राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर अजित पवार यांच्या पत्नी व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार यांच्यासह संपूर्ण पवार कुटुंबीयांनी गोजुबावी येथील त्या दुर्दैवी विमान अपघातस्थळाला भेट देऊन अजितदादांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. २८ जानेवारी रोजी बारामती येथे जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी येत असताना अजित पवार यांच्या चार्टर्ड विमानाचा



गोजुबावी परिसरातील धावपट्टीवर अपघात झाला होता. विमान कोसळून झालेल्या भीषण स्फोटात अजितदादांसह वैमानिक, केबिन क्रू आणि अंगरक्षकाचे दुर्दैवी निधन झाले होते. आज सकाळी पवार कुटुंबीय बारामती विमानतळाजवळ असलेल्या गोजुबावी गावातील धावपट्टीजवळ पोहोचले. तिथे अजित पवार ज्या ठिकाणी कोसळले, त्या जागेवर जाऊन सुनेत्रा पवार यांनी पुष्पचक्र अर्पण केले. दादांच्या आठवणीने सुनेत्रा पवार एकटक त्या जागेकडे पाहत राहिल्या आणि अत्यंत अश्रूंकुल झाल्या. यावेळी पार्थ पवार, जय पवार, ऋतुजा पाटील व विजया पाटील यांच्यासह उपस्थित सर्वांचेच डोळे पाणावले होते.काल मध्यरात्री सुनेत्रा पवार यांनी बारामतीच्या विद्या प्रतिष्ठान येथील अजितदादांच्या स्मृतीस्थळाचे दर्शन घेऊन अभिवादन केले होते. आज दिवसभरात बारामतीसह संपूर्ण महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अजितदादांच्या आठवणींना उजाळा देत विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

**'हे कटू सत्य स्वीकारायला मन तयार नाही' – सुनेत्रा पवार**

याप्रसंगी सोशल मीडियावर अत्यंत भावूक पोस्ट शेअर करत सुनेत्रा पवार यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. 'एवढी वर्षे तुमचा जन्मदिवस आनंदाने आणि उत्साहाने साजरा केला. पण आज हाच दिवस 'जयंती' म्हणून मानताना मन आतून पार तुटून जात आहे. आयुष्याच्या प्रत्येक वळणावर तुम्ही माझी सर्वात मोठी ताकद बनून सोबत राहिलात. काळाने माझा हा आधार एवढ्या लवकर हिरावून नेईल, असं स्वप्नातही वाटलं नव्हतं,' अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली.



# जंतरमंतर वरील, मंतरलेले आंदोलन



मुख्य न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या टिप्पणी चा विपर्यास करुन, परदेशात गेलेल्या एका भारतीय तरुणाने समाज माध्यमांवर रातोरात "कॉक्रोच जनता पार्टी", ची स्थापना केली. त्याला कैक कोटी फॉलोवर्स देखील मिळाले. आणि त्याला जगातील दिग्गज नेत्यांच्या रांगेत बसवले गेले. नीट ची परीक्षा झाली. पेपर फुटल्याचे सिद्ध झाले. दोषींवर ताबडतोब कारवाई करण्यात आली. फेरपरीक्षा झाली, त्याचा निकाल देखिल जाहिर झाला. परंतु पेपर फुटल्यामुळे व्यथित होऊन काही विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली. हे अतीशय दुःखदायक आहे.

या घटनांचा निषेध आणि केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा म्हणून, कॉक्रोच जनता पार्टी च्या संस्थापकानं दिल्ली येथील जंतरमंतर वर आंदोलन करण्याची घोषणा केली. आंदोलनासाठी तो आला आणि सुरू पण केलं. विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाच्या विरोधात लढतो आहे म्हणून आपुलकी वाटली. परंतु लद्दाख च्या तथाकथित वाघाने आंदोलनात उडी घेतली. त्याने जंतरमंतर वर आमरण उपोषण सुरू केले, आणि बघताबघता विद्यार्थ्यांच्या हितासाठी सुरू असलेले आंदोलन भारल्या गेले. देशातील नामांकित विघटनवादी मांत्रिक त्यांचे शिष्य, झाडू वाले, सायकल वाले, हात वाले, तुकडे तुकडे टोळी, लाल, हिरव्या, निळ्यांचा प्रवेश झाला.

आणि विद्यार्थी आंदोलनाचा अस्त होऊन, सुधारित शाहीन बाग आणि किसान आंदोलन सुरू झाले आहे. संसद भवना वरील मार्च आणि घडत असलेल्या घटनां वरून असे दिसते. देशात घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षा कुठलाही गैरप्रकार न होता पार पडणे आवश्यकच आहे. विद्यार्थी हिताच्या दृष्टीने शैक्षणिक धोरण आणि परीक्षा पद्धतीत बदल व्हावा यासाठी सरकारला अभ्यासपूर्ण सूचना देण्यात याव्यात. त्यासाठी प्रामाणिकपणे लढा द्यावा. देशातील सरकार उलथवून टाकण्यासाठी विद्यार्थ्यांच्या भावनेशी खेळू नये, त्यांचा प्याद्या प्रमाणे वापर करणे योग्य नाही.

पेपर फुटी साठी काही पालक देखील जबाबदार आहेत. आपल्या नालायक पाल्यांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी, ते अनेक होतकरू विद्यार्थ्यांचे भविष्य मातीत मिळवतात. पेपर फोडणाऱ्यां प्रमाणे पेपर विकत घेणाऱ्या पालकांवर देखील कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. कारण या गैरप्रकारासाठी ते देखिल तितकेच जबाबदार आहेत. सध्याचे युग कठीण स्पर्धेचे आहे, याची पूर्ण कल्पना आहे. परंतू विद्यार्थ्यांनी खचून जाऊन आत्महत्येचा निर्णय घेवू नये. आपल्या आईवडिलांचा विचार करून पुन्हा जोमाने प्रयत्न करावा. ईश्वर एक मार्ग बंद करतो, तर दुसरा उघडतो असा सकारात्मक विचार मनात ठेवावा. कारण एक म्हण आहे की, उम्मिद पे दुनिया कायम है.

**हेमंत जकाते,** अकोला

# पावसाची कोंडी फुटली!



उकाड्याने हैराण झालेली काळी आई, करपून जाणारी शेतं, आणि आभाळाकडे डोळे लावून बसलेला बळीराजा... गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण वातावरणच कसं अस्वस्थ आणि तप्त झालं होतं. उन्हाचा चटका इतका वाढला होता की, वाराही जणू जळत्या उसासासारखा लागत होता. आभाळात मध्येच ढग जमायचे, आशेचा किरण जगायचा; पण वाऱ्याची एकच झुळूक यायची आणि ते ढग पांगवून टाकायची. पावसाची ही हुलकावणी मनाला चटका लावून जात होती.



पण निसर्गाचा खेळही मोठा अनाकलनीय असतो. आज अचानक वातावरणात एक वेगळाच बदल झाला. सकाळपासूनच हवेतला दमटपणा वाढला होता. दुपारी चारच्या सुमारास क्षितिजावर काळ्याकुट्ट ढगांची दाटी झाली. वाऱ्याचा वेग मंदावला आणि आसमंतात एक गूढ शांतता पसरली. आणि... अचानक विजांचा कडकडाट झाला! अखेर पावसाची कोंडी फुटली!

"आला गसरून उन्हाचा डोंगर,  
आभाळ झुकले मातीवर...  
थेंब टपोरे झेलत अंगावर,  
आनंद झाला या भूतलावर..."

पहिल्या पावसाचे थेंब जेव्हा तापलेल्या जमिनीवर पडले, तेव्हा मातीचा तो सोधा, सुगंधित वास (पेट्रीचोर) आसमंतात भरून राहिला. तो वास केवळ नाकापर्यंत पोहोचला नाही, तर थेट आत्म्याला स्पर्श करून गेला. पावसाच्या टपोऱ्या थेंबांनी जणू सृष्टीची तहान भागवली. पाना-फुलांवर साचलेली धूळ निघून गेली आणि सगळी झाडं अगदी ताजीतवाने, हिरवीगार दिसू लागली.

पावसाची कोंडी फुटताच प्रत्येकाचा चेहरा फुलला. रस्त्यावरची लहान मुलं कसलीही तमा न बाळगता पावसात भिजायला धावली. छत्री असूनही ती बंद करून भिजण्यातला आनंद काही वेगळाच होता. शहरातल्या गच्चीवरून, गल्लीबोळातून आणि रस्त्यांवरून पाण्याचे छोटे-छोटे लोट वाहू लागले. पण या पावसाचा सर्वात जास्त आनंद झाला आहे तो आपल्या बळीराजाला! उशिरा का होईना, पावसाने हजेरी लावल्यामुळे त्याच्या डोळ्यांत आशेचे पाणी आणि चेहऱ्यावर समाधान उमटले आहे. आता वावरात नांगरणीचा, पेरणीचा उत्साह दुप्पट होईल. सुकलेल्या पिकांना जणू नवीन संजीवनीच मिळाली आहे.पावसाची कोंडी फुटणे म्हणजे केवळ ढग बरसणे नाही, तर ती माणसाच्या चिंतेची, उकाड्याची आणि नैराश्याची कोंडी फुटणे असते. पाऊस आपल्यासोबत नवचैतन्य, आशा आणि समृद्धी घेऊन येतो. निसर्गाचे हे रूप मनाला एक वेगळीच शांतता देऊन जातं. चला तर मग, पावसाच्या या पहिल्या सरींचं मनमोकळेपणाने स्वागत करूया आणि या निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेऊया!

# अवधूत चिंतन श्री गुरु देवदत्त



माणसाला सतत वाटत की उद्यापासून सगळं बदलेल. उद्यापासून मी लवकर उठेन, उद्यापासून मी शांत राहीन, उद्यापासून मी रागावणार नाही, उद्यापासून मी नामस्मरण नियमित करेन. आणि हे उद्या कधीच येत नाही,..बरोबर ना?? कारण उद्या उजाडला की तो पुन्हा आजच असतो, आणि आजच मन पुन्हा उद्यावर ढकलायला तयार असत.. म्हणजे काय...ही जी टाळाटाळ आहे, ती आळसातून येत नाही इतकी, जितकी भीतीतून येते. बदल घडवायचा म्हणजे स्वतःच्या सवयींशी झगडायच, स्वतःच्या मनाशी लढायच, आणि हे लढण अवघड वाटत म्हणून आपल मन त्यातही सोपा रस्ता निवडत, तो म्हणजे पुढे चाल ढकल करण...आपल्या मनाच्या समजतीनुसार उद्यापासून सुरुवात करेन अस म्हणण्यात एक सुप्त सुटकाही असते, आजच्या जबाबदारीतून आजच सुटका. सद्गुरूंनी मात्र नेहमी सांगतात..., साधना उद्यासाठी नसते, साधना याच क्षणासाठी असते. जो क्षण हातात आहे, तोच खरा आहे, उद्याचा क्षण अजून जन्मलाही नाही. त्यामुळे जो माणूस उद्याची वाट बघत बसतो, तो प्रत्यक्षात नसलेल्या क्षणासाठी असलेला क्षण गमावत असतो. गुरुचरित्रात आणि संतवाङ्मयात नामस्मरणाच महत्त्व सांगताना नेहमी हाच भाव आहे, आत्ताच्या श्वासात नाम घ्या, आत्ताच्या क्षणात सद्गुरूंच स्मरण करा. कारण हा श्वास पुन्हा येईल याची खात्री कुणालाच नाही. जे आजच शक्य आहे, ते उद्यावर ढकलणं हा एक प्रकारचा भ्रमच आहे, कारण उद्या हा दिवस कधी प्रत्यक्षात येतच नाही, तो नेहमी आजच्या रूपातच येतो.. खरय.. म्हणून आजपासून, आत्तापासून, याच क्षणापासून जे करायचं आहे ते सुरू करावं, मग ते नामस्मरण असो, क्षमा असो, किंवा एखादी छोटी सवय बदलणं असो. सद्गुरूंच्या चरणी हीच प्रार्थना असावी की उद्याची वाट बघण्याची सवय सुटावी, आणि आत्ताचा क्षण पूर्णपणे त्यांच्या स्मरणात जगण्याचं बळ मिळाव...

|| अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ||

# ज्ञानेशांची इच्छापूर्ती करणारे संत : श्री ज्ञानेश्वरदास



भगदावतारी संत आपले कार्य ठरवून या अवनीतलावर जगदोद्धारार्थ स्वेच्छेने अवतरीत होत असतात. आणि नियोजित आयुष्य मर्यादेच्या आतच आपले सर्व अवतार कार्य पूर्ण करीत , त्याचा लेखाजोखा भगवद्दरबारी सादर करून, अवतार समाप्तीची परवानगी त्यांच्याकडे मागत असतात. या नियमाप्रमाणे वयाच्या अवघ्या एकविस वर्षाच्या आत अभंग गाथा, हरिपाठ , चांगदेव पासष्टी, ग्रंथराज ज्ञानेश्वरी व अमृतानुभवादि जगद्मान्य अद्वितीय स्वरूप ग्रंथसंपदा निर्मितीसह आबालवृद्धांच्या उद्धारार्थ स्वतःच्या खांद्यावर पताका घेऊन श्री क्षेत्र आळंदी ते पंढरपूर पायी वारी सोहळ्याची सुरुवात करून, त्याची घडी व्यवस्थित बसवून, भगवानश्री ज्ञानोबाराय वारी निमित्य भावंडांसह पंढरीक्षेत्री आले असतांना भगवान पंढरीशांचे दर्शन घेऊन, शके १२१८मध्ये त्यांना विनंती करतात की, हे देवा ! "ज्ञानदेव म्हणे विठ्ठलासी । समाधान तूंचि होसी । 'परी समाधि हे तुजपासी । घेईन देवा' ॥ " तेव्हा भगवंत त्यांच्या मागणीतील 'पंढरी क्षेत्र' वगळून समाधीसाठी आळंदी क्षेत्र निश्चित करतात. आणि कार्तिक वद्य त्रयोदशी शके १२१८ दि.२५.११.१२९६ गुरुवार रोजी दुपारी अडीच वाजता वयाच्या अवघ्या २१ वर्ष ३ महिने पाचव्या दिवशी स्वहस्ते संजीवन समाधी देतात. आपले आराध्य असणाऱ्या भगवानश्री ज्ञानेशांच्या पंढरी क्षेत्रात समाधी घेण्याच्या त्या इच्छेची पूर्तता संतश्री ज्ञानेश्वरदासांनी तब्बल ७१३ वर्षांनंतर शके १९३१ ला पूर्ण करून घेतली त्यासंबंधी थोडेशे चिंतन.

तिये स्थितप्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वतें दुभे । मग सकळ शास्त्रें स्वयंभे । निघती मुखें ॥ या ज्ञानेशवचनांनुसार योगभ्रष्ट महात्म्याला जातिस्मरतेमुळे गतजन्मात तयार झालेली बुद्धी अनुकूल असल्यामुळे , त्याचे मनच सर्व विद्यांना प्रसवते आणि मग सर्व शास्त्र आपोआपच त्याच्या मुखातून निघतात . या न्यायाने जातिस्मर असणाऱ्या संतश्री वासुदेवजी महाराज उपाख्य ज्ञानेश्वरदासांना सुद्धा बालपणीच सर्वज्ञतेने वरलेले असल्यामुळे, वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षापासून कीर्तनाच्या निमित्ताने त्यांच्या 'मुखातून' तसेच गद्यपद्यात्मक तब्बल ३७ ग्रंथ संपदेच्या माध्यमातून, त्यांच्या सिद्धहस्त 'लेखणीतून' प्रत्यक्ष ज्ञानगंगाच प्रवाहित झाली. नैष्टिक बालब्रह्मचारी व आजन्म अखंड सेवाव्रत्ती असणाऱ्या या अजानबाहू महात्म्याने वारकरी संप्रदायावर होत असणारे अतिक्रमण आणि आक्रमण सर्व शक्तीनिशी सनदशीर मार्गाने परतविले. असे असतांना सुद्धा कुठल्याही गोष्टीचा गवगवा किंवा त्या यशाच्या श्रेयाचा मोठेपणा मिरवत कुठलाही पुरस्कार किंवा सत्कार आयुष्यात न स्वीकारता ज्ञानेशादि चारही भावंडांची जन्म ,लीला, कर्म व अखंड वास्तव्याने पुनित झालेली आळंदीस्थित सिद्धबेट नामक भूमीला समाजकंटकांच्या घशातून काढून, वारकऱ्यांकरीता मुक्त केल्यानंतर आपल्या अवतार कार्याचा लेखाजोखा दि.३०.६.२००९ रोजी योगी सम्राट श्रीसंत गजानन महाराज संस्थान शाखा पंढरपूर येथे दुपारी प्रवचन व रात्रौ कीर्तनाच्या माध्यमातून भगवान पंढरीशांना सुपूर्त करून,"हेचि व्हावी माझी आस । जन्मोजन्मीं तुझा दास ॥ पंढरीचा वारकरी । वारी चुकों नेदी हरी ॥" या जगद्गुरुंच्या वचनांद्वारे विनंती अर्ज त्यांना सदर केला. भगवंतांनी सुद्धा त्यात कुठलीही त्रुटी न काढता तो आहे तसा मंजूरही केला. अखेरीस २.७.२००९ आषाढ शुद्ध एकादशी शके १९३१ गुरुवार रोजी रात्रौ ९.४५ ला ज्ञानोबा तुकोबारायादि सर्व साधुसंतांच्या पंढरीक्षेत्री आगमनानंतर किंबहुना त्यासर्वांच्या पावन सूक्ष्म उपस्थितीत भगवान श्री ज्ञानेशांची "परि समाधि हे तुजपासी । घेईन देवा ॥" हे अपूर्ण राहिलेली इच्छा श्रीसंत ज्ञानेश्वरदासांनी पूर्ण करून घेतली. अशा ज्ञानेशांची इच्छा व कार्यपूर्ती करणाऱ्या ज्ञानेश प्रिय संतश्री ज्ञानेश्वरदासांच्या आषाढी एकादशी पर्व काळावर पंढरीक्षेत्री संपन्न होत असणाऱ्या पुण्यतिथी निमित्ताने हे शब्द सुमन त्यांची चरणी समर्पित.

**ज्ञानेश्वर महाराज वाघ**  
श्री संत वासुदेव महाराज स्मृती मंदिर  
श्री ज्ञानेश आश्रम वारी ( भैरवगढ )

# दिल्लीतील आंदोलन, हिंदुत्व आणि आम आदमी पक्षाची भूमिका



दिल्लीतील नीट NEET परीक्षेसंदर्भातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना समाजाने आणि सरकारने गांभीर्याने घेणे आवश्यक आहे.

मात्र, अशा आंदोलनाच्या व्यासपीठावर जर भारतविरोधी भूमिका मांडणाऱ्या किंवा हिंदू धर्मातील श्रद्धास्थानांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या व्यक्तींना स्थान दिले जात असेल, तर त्यावर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी सुरू झालेल्या आंदोलनाचे स्वरूप जर इतर वादग्रस्त राजकीय किंवा वैचारिक मुद्द्यांकडे वळत असेल, तर त्यामुळे मूळ प्रश्न बाजूला पडण्याचा धोका निर्माण होतो. कोणत्याही आंदोलनाला पाठिंबा देताना त्या आंदोलनातील सर्व वक्ते, त्यांची विधाने आणि त्यांची सार्वजनिक भूमिका यांचाही विचार करणे आवश्यक असते. भारताच्या एकात्मतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या किंवा कोणत्याही धर्माच्या श्रद्धास्थानांबाबत आक्षेपार्ह भाषा वापरणाऱ्या व्यक्तींना व्यासपीठ देणे योग्य ठरू शकत नाही. भारताचे संविधान अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार देते, पण त्याचबरोबर राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि परस्पर सन्मान यांचीदेखील अपेक्षा करते. राजकीय पक्षांनीही कोणत्याही आंदोलनाला पाठिंबा देताना त्यातील सर्व पैलूंचा विचार करणे आवश्यक आहे. एखाद्या पक्षाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना पाठिंबा दिला असेल, तर त्याचा अर्थ त्या व्यासपीठावर उपस्थित प्रत्येक व्यक्तीच्या विचारांनाही पाठिंबा आहे का, हा प्रश्न जनतेला पडू शकतो. त्यामुळे कोणत्याही पक्षाने आपली भूमिका स्पष्टपणे मांडणे गरजेचे आहे.

लोकशाहीत टीका, आंदोलन आणि मतभेद यांना स्थान आहे. परंतु भारताची अखंडता, सर्व धर्मांचा सन्मान आणि सामाजिक सौहार्द या मूल्यांशी तडजोड होऊ नये, ही प्रत्येक नागरिकाची अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना न्याय मिळालाच पाहिजे, पण त्याचवेळी कोणत्याही प्रकारच्या भारतविरोधी किंवा धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या विचारांना समर्थन मिळू नये, ही भूमिका स्पष्ट आणि ठाम असणे आवश्यक आहे. दिल्लीच्या आंदोलनाची धग विविध राज्यात पोहचत आहे. विद्यार्थी आक्रमक झालेले दिसत आहे. भविष्याचा विचार केंद्र शासनाने करावा कारण बेरोजगार तरुणांच्या हाताला काम हवे आहे. वैफल्यग्रस्त अवस्थेचा सामना युवा शक्ती करीत आहे. रोजगार संधी उपलब्ध व्हाव्यात तसेच नीट सारख्या परीक्षेतील गैरप्रकार पुन्हा होणार नाही याची जबाबदारी शासनाने घ्यावी अशी मागणी केली जात आहे. विविध ठिकाणी होत असलेल्या आंदोलनात युवक मोठ्या संख्येने उतरले आहेत.

# जागतिक मेंदू दिन : सुदृढ मेंदू, समृद्ध जीवन

## आज दिन विशेष

आपल्या शरीराचे संपूर्ण नियंत्रण करणारा आणि भावना, विचार, आठवणी व हालचालींचे केंद्र असलेला महत्त्वाचा अवयव म्हणजे मेंदू. दरवर्षी २२ जुलै हा दिवस जगभरात 'जागतिक मेंदू दिन' (World Brain Day) म्हणून साजरा केला जातो.

'वर्ल्ड फेडरेशन ऑफ न्यूरोलॉजी' (WFN) तर्फे २०१४ सालापासून या दिवसाची सुरुवात करण्यात आली. मेंदूच्या आरोग्याविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, चेतातंतूशी संबंधित आजारांचे (Neurological Disorders) वेळेत निदान व उपचार करणे आणि प्रत्येकाला आरोग्याच्या चांगल्या सुविधा मिळवून देणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. मेंदूचे आरोग्य आणि आजची जीवनशैली आजच्या धावपळीच्या युगात, वाढता मानसिक ताणतणाव, अपुरी झोप, चुकीचा आहार आणि तासनतास स्क्रीनसमोर घालवलेला वेळ या सर्वांचा मेंदूवर थेट प्रतिकूल परिणाम होत आहे.

मेंदूशी संबंधित अनेक आजार जसे की: स्ट्रोक (Stroke / पक्षघात) अल्झायमर व डिमेंशिया (स्मृतीभ्रंश) मायग्रेन (अर्धशिशी) पार्किन्सन्स मिरगी / फेफरे (Epilepsy) हे विकार वाढताना दिसत आहेत. यातील बहुतांश आजार हे वेळीच योग्य काळजी घेतल्यास किंवा योग्य उपचारांनी नियंत्रित केले जाऊ शकतात. मेंदू निरोगी ठेवण्यासाठी महत्त्वाच्या टिप्स आपल्या रोजच्या सवयींमध्ये थोडे बदल करून आपण मेंदूचे आरोग्य दीर्घकाळ उत्तम ठेवू शकतो.

**१. संतुलित आणि पोषक आहार**

मेंदूच्या उत्तम कार्यक्षमतेसाठी ओमेगा-३ फॅटी ॲसिड (उदा. अक्रोड, बदाम, जवस), अँटीऑक्सिडंट्स युक्त फळे आणि पालेभाज्यांचा आहारात समावेश करा. पुरेशा प्रमाणात पाणी प्या.

**२. नियमित व्यायाम**

रोज किमान ३० मिनिटे चालणे, योगासने किंवा हलका व्यायाम केल्याने मेंदूकडे होणारा रक्तपुरवठा सुधारतो.


**३. पुरेशी आणि शांत झोप**

प्रौढ व्यक्तीसाठी रोज ७ ते ८ तासांची झोप अत्यंत आवश्यक आहे. झोपेमुळे मेंदूतील विषारी घटक बाहेर पडण्यास आणि स्मृती दृढ होण्यास मदत होते.

**४. मेंदूला आव्हान द्या (Brain Exercise)**

कोडी सोडवणे, नवीन भाषा किंवा कौशल्य शिकणे, पुस्तके वाचणे आणि संगीत ऐकणे यामुळे मेंदूच्या पेशी सक्रिय राहतात.

५. डिजिटल डिटॉक्स आणि ताणतणाव व्यवस्थापन स्क्रीन टाईम (मोबाईल, टीव्ही, लॅपटॉप) मर्यादित




ठेवा.ध्यान (Meditation) आणि प्राणायाम करून तणाव कमी करण्याचा प्रयत्न करा.

**६. व्यसनांपासून दूर राहा** -धुम्रपान, मद्यपान आणि नशा आणणाऱ्या पदार्थांमुळे मेंदूच्या नसांचे गंभीर नुकसान होते.

**महत्त्वाची टीप :** जर तुम्हाला किंवा तुमच्या घरातील कोणाला वारंवार तीव्र डोकेदुखी, अचानक विसर पडणे, हात-पायांना मुंग्या येणे, चक्कर येणे किंवा बोलताना अडखळणे असा त्रास होत असेल, तर त्याकडे दुर्लक्ष न करता ताबडतोब न्यूरोलॉजिस्ट (चेतातंतूतज्ज्ञ) डॉक्टरांचा सल्ला घ्या. थोडक्यात सांगायचे तर, "आरोग्यदायी मेंदू म्हणजेच उत्तम जीवन." या जागतिक मेंदू दिनाच्या निमित्ताने आपण सर्वजण आपल्या मेंदूच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्याचा आणि एक संतुलित जीवनशैली स्वीकारण्याचा संकल्प करूया!

# निसर्गाची संजीवनी: 'हा' पाऊस पिकांसाठी ठरेल का वरदान?

गेल्या काही दिवसांपासून शेतकरी ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होता, तो क्षण अखेर उजाडला आहे. ताणलेल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या ताज्या पावसाने केवळ धरणीची तहान भागवली नाही, तर संकटात सापडलेल्या बळीराजाच्या आशा-आकांक्षांनाही पुन्हा पल्लवित केले आहे. पण खरोखरच हा पाऊस पिकांसाठी संजीवक ठरेल का? शेती तज्ज्ञ आणि कृषी हवामान शास्त्रज्ञांच्या मते, हा पाऊस केवळ पाणी नाही, तर सुकणाऱ्या पिकांसाठी प्रत्यक्ष 'अमृत' ठरत आहे. पिकांच्या वाढीच्या अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यात जेव्हा पावसाने दांडी मारली होती, तेव्हा पिके सुकू लागली होती. जमिनीतील ओलावा संपल्याने झाडांची अन्नद्रव्ये शोषून घेण्याची क्षमता मंदावली होती. या पावसाने जमिनीला पुन्हा ओल मिळाल्यामुळे मुळांची कार्यक्षमता वेगाने वाढेल. पाण्याची टंचाई दूर झाल्यामुळे पिकांच्या पानांमध्ये पुन्हा हरितद्रव्य (Chlorophyll) तयार होण्याच्या प्रक्रियेला गती मिळेल, ज्यामुळे पिके पुन्हा हिरवीगार दिसू लागतील. या पावसाचा वेगवेगळ्या पिकांवर अत्यंत सकारात्मक परिणाम दिसून येईल. पावसाने दडी मारल्यामुळे शेती, पिण्याचे पाणी या संदर्भात चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली होती. प्रत्येक जण पाऊस वेळेवर येईल का याकडे डोळे लावून बसला होता. ही कोंडी मंगळवारी सायंकाळी झालेल्या दमदार पावसामुळे तजेलदार वातावरण निर्माण झाले आहे. बुधवारी सकाळ पासून ढगाळ वातावरण निर्माण झाले. मात्र अजूनही चांगल्या पावसाची सगळ्यांना प्रतीक्षा आहे. कारण पावसा अभावी पिके कोमेजून गेली होती. जल प्रकल्पाची पातळी कमी होऊ लागली होती.

३
सिटी न्यूज अकोला
बुधवार, दि. २२ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# तेल्हारा शहराच्या विकासाकरिता विरोधी गटातील नगरसेवकांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**तेल्हारा :** तेल्हारा नगर परिषदेच्या हद्दीत समाविष्ट परंतु विकासापासून कोसो दूर असलेल्या पांढरीचा विकास , योगेश्वर कॉलनीतील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याबाबत , इंदिरा नगरातील रहिवाशांचा प्रश्न तसेच पालिकेतील कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे नागरिकांना होत असलेला त्रास याबाबत जिल्हाधिकारी अकोला यांना पालिकेतील विरोधी गटातील नगरसेवकांनी सदर मागण्या पूर्ण करण्यात याव्यात करीत निवेदन दिले.

पालिकेच्या विरोधी गटातील विरोधीपक्ष नेते राजेश खारोडे, नगरसेवक कैलास ठोकणे, गट नेत्या कान्होपात्रा फाटकर, नगरसेविका पंचफुलाबाई कवर यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन योगेश्वर कॉलनी मध्ये गेल्या अनेक वर्षा पासून मोठया प्रमाणात पाणी साचत असल्याने व सांडपाणी घरात शिरत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. इंदिरा नगर मधील शासकीय जागेवरील अतिक्रमण नियमित करून पात्र रहिवाश्यांना मालकी हक्क प्रदान करण्यासाठी मागणी करण्यात आली तसेच शहरातील प्रभाग क्र. १ मधील पांढरी हा भाग सुमारे ५ वर्षांपूर्वी कोठा ग्राम पंचायत मधून तेल्हारा नगरपरिषदेच्या हद्दीत समाविष्ट करण्यात आला आहे. या भागामध्ये शंभर टक्के अनुसूचित जाती प्रवर्गातील नागरिक वास्तव्यास असून, अनेक वर्षांपासून हा भाग मूलभूत नागरी सुविधांपासून वंचित आहे. नगरपरिषद हद्दीत समावेश झाल्यानंतर येथील नागरिकांना विकासाची अपेक्षा होती. मात्र आजपर्यंत नगरपरिषदेकडून या भागासाठी कोणत्याही प्रकारचा विशेष निधी मंजूर करण्यात आलेला नाही किंवा आवश्यक विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे येथील नागरिकांना रस्ते, नाल्या, पिण्याचे शुद्ध पाणी, सांडपाणी व्यवस्थापन, पथदिवे, स्वच्छता, सार्वजनिक शौचालय, आरोग्यविषयक सुविधा अंगणवाडी व इतर मूलभूत सोयी-सुविधांअभावी अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.

विरोधी गटातील नगरसेवकांनी विकास कामांन बाबत केलेल्या मागणी बाबत लक्ष द्यावे असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी पालिका मुख्याधिकाऱ्यांना दिलेत या वेळी तहसीलदार महेश रामगुंडे , नगराध्यक्षा वैशाली पालिवाल मुख्याधिकारी सतीश गावंडे पालीकेच्या विविध विभागाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# अकोटमध्ये 6.20 कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

वि. प्रतिनिधी 22 जुलै



**अकोट :** अकोट शहरातील विविध प्रभागांमध्ये मंजूर झालेल्या सुमारे ६ कोटी २० लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळे आमदार प्रकाश पाटील भारसाकळे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाला अकोट नगर परिषदेच्या नगराध्यक्षा मायाताई धुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रभाग क्रमांक ९ मधील राजदे प्लॉट व जिजामाता नगर परिसरात एक कोटी रुपयांच्या रस्ते व भुयारी नाला विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. तसेच प्रभाग क्रमांक १७ मध्ये एक कोटी रुपयांच्या 'नमो उद्यान' प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. अनेक वर्षांपासून पक्के रस्ते व नाल्यांच्या अभावामुळे नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांवर या कामांमुळे दिलासा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी हनुमान मंदिर प्रतिष्ठान व व्यायाम प्रसार मंडळ या संस्थेचे उद्घाटनही करण्यात आले. या माध्यमातून युवकांसाठी आधुनिक व्यायामशाळा, स्पर्धा परीक्षा अभ्यासिका तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र उभारण्यात येणार आहे.

कार्यक्रमास उपनगराध्यक्ष प्रथमेश बोरोडे, बांधकाम सभापती सुशील पुंडकर, आरोग्य सभापती मनीष कराळे, पाणीपुरवठा सभापती अमोल पालेकर, तसेच नगरसेवक, भाजप पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुर्तीजापूर मतदारसंघातील 26.80 किमी रस्त्यांच्या कामांना मंजुरी

## आमदार हरीश पिंपळे यांच्या प्रयत्नांना यश

**मुर्तीजापूर :** मुर्तीजापूर विधानसभा मतदारसंघातील तालुका मुर्तीजापूर, बार्शीटाकळी तसेच अकोला तालुक्यातील ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री ग्राम सडक योजना (टप्पा-३) अंतर्गत सुमारे २६.८० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांच्या पुनर्स्थापना व उन्नतीकरणाच्या कामांना शासनस्तरावर मंजुरी मिळाली आहे. आमदार हरीश पिंपळे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश मिळाले आहे.

मंजूर कामांमध्ये राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ सोनारी ते मुर्तीजापूर रस्ता (२.५० कि.मी.), प्रजिमा-१६ ते कानडी शेड रस्ता (४.४० कि.मी.), प्रजिमा-२२ ते सारखणी रस्ता (७.५० कि.मी.), प्रजिमा-२२ ते बारामळी निंबी रस्ता (४.०० कि.मी.) तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३ ते दगा ते कोठारी रस्ता (६.०० कि.मी.) या रस्त्यांचा समावेश आहे.

या रस्त्यांचे पुनर्स्थापना व उन्नतीकरण करताना ५.५० मीटर रुंदीचे डांबरीकरण करण्यात येणार असून, या कामांमुळे ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी तसेच व्यापारी वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. याशिवाय मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या टप्पा-३ अंतर्गत मुर्तीजापूर मतदारसंघातील मुधापुरी रस्त्यावरील पुलाच्या बांधकामालाही मंजुरी मिळाली असून, त्यासाठी ४०१ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

या विकासकामांमुळे मतदारसंघातील ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था अधिक गतिमान होऊन नागरिकांना सुरक्षित व सुकर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. आमदार हरीश पिंपळे यांच्या प्रयत्नांतून मिळालेल्या या मंजुरीबद्दल नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, लवकरच संबंधित कामांना सुरुवात होण्याची अपेक्षा आहे.

# अकोट नगर परिषदेची मान्सूनपूर्व नालेसफाई अर्धवट

## नंदीपेठ परिसरातील नागरिकांमध्ये संताप

निखिल टिकले 22 जुलै



**अकोट :** पावसाळ्यापूर्वी शहरातील नाले व गटारी स्वच्छ करण्यासाठी अकोट नगर परिषदेमार्फत मान्सूनपूर्व नालेसफाई मोहीम राबविण्यात आली. मात्र, शहरातील काही भागांमध्ये ही मोहीम अद्याप अपूर्ण असल्याचे दिसून येत असून, नंदीपेठ परिसरातील नागरिकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

नंदीपेठ येथील बिलबिले भवनाच्या पाठीमागे असलेल्या नाल्याची स्वच्छता अद्याप पूर्ण झालेली नसल्याने परिसरात घाण साचली आहे. नाल्यालगत राहणाऱ्या नागरिकांना यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः नाल्याच्या झुडपांमधून व साचलेल्या कचऱ्यातून साप, विंचू यांसारखे विषारी प्राणी घरांमध्ये शिरत असल्याची तक्रार रहिवाशांनी लोकप्रतिनिधी कडे केली आहे.


परिसरातील अनेक घरांमध्ये लहान मुले तसेच पाळीव जनावरे असल्याने त्यांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची भीती नागरिक व्यक्त करत आहेत. पावसाळा सुरू झाल्यानंतर नाल्याची वेळेत साफसफाई न झाल्यास डासांची उत्पत्ती वाढून साथीच्या रोगांचा धोका देखील वाढू शकतो, अशी चिंता स्थानिकांनी व्यक्त केली.

नागरिकांनी या समस्येबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना वारंवार माहिती दिली असल्याचा दावा केला आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने रहिवाशांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. विशेष बाब म्हणजे संबंधित नाला हा प्रभाग क्रमांक १४ आणि १५ यांच्या मध्यभागी असून या भागाचे प्रतिनिधित्व करणारे चार नगरसेवक असतानाही नागरिकांच्या मूलभूत समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाने तातडीने लक्ष घालून संबंधित नाल्याची संपूर्ण स्वच्छता करावी, झुडपे हटवावीत आणि आरोग्यविषयक धोके टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. दरम्यान, मान्सूनपूर्व नालेसफाई मोहिमेवर खर्च करण्यात आलेला निधी आणि प्रत्यक्षात झालेली कामे याबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात असून, प्रशासनाने याबाबत स्पष्ट भूमिका घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

# राहत्या घरातून मोटारसायकल लंपास

प्रतिनिधी 22 जुलै



**हिवरखेड :** येथील विकास मैदानातील पेठपुरा गल्लीमधील रहिवाशी भालचंद्र अग्रवाल यांच्या मालकीची मोटरसायकल चोरीला गेल्याची मोठी घटना समोर आली

शिवा भालचंद्र अग्रवाल वय ( २०)वर्षे या युवकाच्या जबानी तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यां विरुद्ध गुन्हा दाखल केला या तरुणाची हिरो स्प्लेंडर कंपनीची काळया रंगांची मोटरसायकल २० जुलैच्या रात्री त्याच्या घरातून चोरट्यांनी लंपास केल्याचे त्याच्या निर्देशनास आले, याने सकाळी तत्काळ पोलिस स्टेशन गाठले शेजारी घराच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात दोन चोरटे रात्री १,३० दरम्यान घरातून मोटरसायकल काढत असल्याचे आढळून आले, या घटनेतील सर्व वित्तभूत माहिती पोलिसांना देण्यात आली, सदर घटनेचा तपास हिवरखेड पोलिस करीत असून रहिवाशांची मागणी जोर धरत आहे, चोरट्यांचा बंदोबस्त पोलिसांनी तत्काळ करावा व आतापर्यंत चोरी झालेल्या वस्तू सदर चोरटे पकडून ज्यांच्या वस्तू चोरी गेल्या त्यांना परत मिळाव्या अशी ही मागणी जोर धरत आहे, चोरीच्या घटनेमुळे नागरिकांन मध्ये धास्ती निर्माण झाली,

## दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**अकोला :** महाराष्ट्र राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व.अजित अनंतराव पवार यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयातील काटेपूर्णा सभागृहात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा खनिकर्म अधिकारी विशाल धांडे, जिल्हाधिकारी कार्यालयातील अधीक्षक श्याम धनमने यांनी स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागाच्या कर्मचाऱ्यांनीही पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# उरळ पोलिसांनी 48 तासात चोरट्यांना घेतले ताब्यात

प्रतिनिधी 22 जुलै



**हातरूण :** ग्राम डोंगरगाव येथील रामेश्वर नारायन इंगळे यांच्या गोठ्यातून ८०००० हजार रू.ची बैलजोडी लंपास केली. १७ जुलाई रोजी उरळ पोलिस स्टेशन येथे करण्यात आली होती. गुन्हा नोंदवण्यात आला होता.

उरळ पोलिस स्टेशनचे ठाणेदार जनार्दन खंडेराव यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कांस्टेबल विजय चौहान व रघुनाथ निमाड़े यांनी ४८ तासात चोरीचा .छडा लावून चोरट्यांना ताब्यात घेतले.

आरोपी संजय भीमरावअघड़ते रा घामणगाव ता . अकोट . यांना ताब्यात घेतला असुन एक बैल जोडी किमत ८० हजार रुपयांची बैलजोडी रामेश्वर इंगळे .रा . डोंगरगाव यांच्या समक्ष जप्त करण्यात आली.

# बाळापूर तालुक्यात समाधानकारक पाऊस

## खरीपाच्या पिकांना मिळाले जीवदान

प्रतिनिधी 22 जुलै

**बाळापूर :** तालुक्यात मंगळवारी दुपारी सार्वत्रिक स्वरूपाचा पाऊस न पडल्यामुळे या वर्षीचे खरीपातील न विविध पिकांना जिवदान मिळाले आहे.

खरीपातील पेरणीनंतर बाळापूर तालुक्यात जवळपास 15 ते 20 दिवसापासून पावसाने दडी मारली होती. त्यामुळे सोयाबीन, कापूस, तूर, उडीद, मूग, ज्वारी आदी पिकांवर पावसाचा ताण आला होता. पावसाअभावी तालुक्यातील हलक्या जमिनीतील पिके सुकू लागली होती. यावर्षी वन्य प्राण्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून हरणे, रोही, रानडुकरे, निलगाई आदीचे कळप शेतात घुसून पिके उध्दवस्त करीत आहेत. अंकुरलेली पिके वन्य प्राण्यांकडून फस्त केली जात असतांना केवळ होणारे नुकसान उघड्या डोळयांनी पाहण्याशिवाय शेतकऱ्यांच्या हाती काहीच नसल्यामुळे निसर्गासह वन्य प्राण्यांच्या जाचालाही शेतकरी पुरते कंटाळले आहे. प्रदिर्घ खंडानंतर म्हणजे पेरणीनंतर 15 ते 20 दिवसांनी मंगळवारी दुपारी तालुक्यात सार्वत्रिक स्वरूपाचा पाऊस झाल्यामुळे खरीपातील पिकांना संजीवनी मिळण्यासोबतव शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. सुकण्याच्या स्थितीत होती तर खारपाणपट्ट्यातील पिकांनी माना टाकण्यास सुरूवात केली होती. परंतु मंगळवारी झालेल्या सार्वत्रिक पावसामुळे खरीपातील पिकांना संजिवनी गिळाली आहे. यार्षीचे खरीप हंगामात बाळापूर तालुक्यातील शेतकऱ्यांनी कापूस 7 हजार 891 हेक्टर, सोयाबीन 31 हजार 165 हेक्टर तर तूर 9 हजार 673 हेक्टर, उडीद 865 हेक्टर, मूग 789 व ज्वारी 33 हेक्टर क्षेत्रफळावर लागवड केली आहे. पावसाने प्रदीर्घ उघडीप दिल्यामुळे सिंचनाची सुविधा असलेल्या शेतकऱ्यांनी अहोरात्र पाणी देवून कोमेजलेल्या पिकांना वाचिवण्याचा प्रयत्न केला.

# जिल्हाधिकारी वर्षा मीना यांचे रेल्वे संबंधी विषय गांभीर्याने घेण्याचे आश्वासन

प्रतिनिधी 22 जुलै



**हिवरखेड :** जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी हिवरखेड येथे भर पावसात धावती भेट दिली. त्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या अस्थिकलशाचे दर्शन घेतले आणि सदाशिव संस्थान येथील प्रस्तावित नमो उद्यानाच्या जागेची पाहणी केली. येथे नगराध्यक्ष सुलभाताई दुतोंडे यांच्यासह अनेक नगरसेवक व शेतकरी, गावकरी यांनी त्यांचे स्वागत केले.

नियोजित दौऱ्यानुसार हिवरखेड नगरपरिषद मध्ये त्यांची सभा होती. परंतु पाऊस सुरू असल्यामुळे हिवरखेड गावात प्रवेश न करताच त्यांनी सदाशिव संस्थान येथे धावती भेट दिली. तेथे गावकरी, शेतकरी व अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ आणि हिवरखेड विकास मंच तर्फे विविध मागण्यांची निवेदने त्यांना देण्यात आले.

शेतकऱ्यांनी अकोट खंडवा ब्रॉडगेज रेल्वे कामाच्या दरम्यान रेल्वे कंत्राटदार व अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे शेकडो एकर शेतीत पाणी साचल्यामुळे लक्षावधी रुपयांचे पिकांचे नुकसान झाले आहे. त्याबाबत नुकसान भरपाई मिळावी आणि भविष्यात पाणीच साचल्यामुळे नुकसान होऊ नये म्हणून रेल्वे मार्गालगत सिमेंट कॉँक्रीटच्या पक्क्या नाल्या बांधून मिळाव्यात जेणेकरून शेतात पाणी साचणार नाही.. आणि ज्यांच्या हलगर्जीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

तसेच अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ व हिवरखेड विकास मंच तर्फे रेल्वे संबंधी विविध 12 मागण्या करण्यात आल्या. ज्यामध्ये प्रामुख्याने जालना खामगाव रेल्वे मार्गाचा विस्तार शेगाव तेल्हारा मार्गे हिवरखेड पर्यंत करण्यात यावा. अकोट चांदुर बाजार रेल्वे मार्गासाठी सर्वेक्षण करण्यात यावे. अकोट मुंबई मेळघाट एक्सप्रेस सुरू करण्यात यावी.

अकोट हिवरखेड खंडवा रेल्वे मार्गाचे काम युद्ध स्तरावर लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे. हिवरखेड येथे सर्व एक्सप्रेस गाड्यांना थांबा देण्यात यावा. यासह अनेक रेल्वे संबंधी महत्वाच्या मागण्या करण्यात आल्या. निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते धिरज बजाज, अर्जुन खिरोडकार, गणेश सुरजोशे केशव कोरडे, शेख जमीर, शहजाद खान, संदीप इंगळे, यांच्यासह सह अनेक पत्रकार उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वांच्या निवेदनांवर गांभीर्याने पाऊले उचलण्याचे सकारात्मक आश्वासन दिले.

नमो उद्यानची जागा पाहणी करून महात्मा गांधींच्या अस्थिकलश स्मारकाचे त्यांनी दर्शन घेतले आणि उपस्थित सर्व मान्यवरांशी संवाद साधला यावेळी तहसीलदार महेश रामगुंडे, मुख्याधिकारी सतीश गावंडे यांच्यासह नगराध्यक्ष सुलभाताई दुतोंडे, उपनगराध्यक्ष प्रतिभाताई येऊल, सभापती व नगरसेवक वंदनाताई वानखडे, वैशालीताई वानखडे, अनिताताई वाकोडे, प्रमिलाताई मानकर, दीपालीताई इंगळे, प्रथमेश नाठे, किरण सेदानी यांचे सह अनेक नगरसेवक, रमेश दुतोंडे, राजेश वानखडे, धनंजय गावंडे, पुरुषोत्तम दामधर, रामकृष्ण केदार, सुरेश नाठे, मोहसीन, सुभाष भगत, सुदाम राऊत यांचेसह अनेक गावकरी आणि नगरपरिषद चे अधिकारी व कर्मचारी सुद्धा हजर होते.

# 'गजर माऊलीचा ' कार्यक्रमातून विठ्ठलभक्तीचा सुरेल जागर

प्रतिनिधी 22 जुलै



**अकोला :** सांस्कृतिक कार्य संचालनालय मुंबईच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त 'गजर माऊलीचा'या विशेष भक्तिसंगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, २४ जुलै रोजी सायंकाळी ६.३० वाजता अकोला येथील प्रमिलाताई ओक हॉल येथे हा कार्यक्रम रंगणार आहे.

कार्यक्रमात प्रसिद्ध श्री विठ्ठलाचे निशिंह भक्त अनेकांना व्यसनमुक्त करणारे कीर्तनकार प्रवचनकार संतोष महाराज पिसे यांच्या पावन वाणीतून

गायनाचार्य हरिश्चंद्र पिसे, भानुदास धोटे, किशोर कावर गीता ताई पिसे, रश्मी पवार,विजय राऊत तबला,गावंडे महाराज शेगाव मृदंग,राजीव जोशी बासरी,लोकेश अवचार,कीबोर्ड,टाळ वादन,भक्तराज गावंडे,सुभाष बेले,राजेश वरुडकर,श्रीकृष्ण झटाले, संचलन डॉ.प्रदीप जी अवचार,गणेशजी बोरकर,धनंजय मिश्रा प्रस्तावना

कल्याणी ताई पवित्रकार यांच्या सुमधुर आवाजातून भक्तिगीते, अभंग आणि विठ्ठलभक्तीपर रचनांचे सादरीकरण करण्यात येणार आह.

यांच्या सुरेल स्वरांतून अभंग, भक्तिगीते आणि विठ्ठलनामाचा गजर अनुभवता येणार आहे.

आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक मानली जाते. वारकरी संप्रदायाने समता, भक्ती, मानवता आणि समाजप्रबोधनाचा संदेश शतकानुशतके जपला आहे. त्या परंपरेचे संगीतबद्ध आणि भावपूर्ण दर्शन या कार्यक्रमातून घडणार असून, सर्व वयोगटातील रसिकांना विठ्ठलभक्तीचा आनंद अनुभवण्याची संधी मिळणार आहे. हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे. सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. २२ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# हत्या करणाऱ्या चौघांना जन्मठेप

प्रतिनिधी २२ जुलै



**यवतमाळ** : कर्जाची रक्कम भरून घरी परतणाऱ्या तरुणाचा वाहनाने पाठलाग करून निर्घृण खून केल्याप्रकरणी लोहारा येथील चार आरोपींना प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची (सश्रम कारावास) शिक्षा सुनावली. प्रत्येक आरोपीला २ हजार रुपये दंडही ठोठावण्यात आला आहे. यवतमाळ येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एल. यावलकर यांच्या न्यायालयाने २१ जुलै २०२६ रोजी या प्रकरणाचा निकाल जाहीर केला.

सिद्धार्थ रामदास वानखेडे (वय ४०), दीपक राममनोहर यादव (वय ४०), सिद्धांत ऊर्फ हेमंत राजेश रावेकर (वय ३५) आणि अजय धर्माजी वासनिक (वय ३०), सर्व रा. देवीनगर, लोहारा, यवतमाळ अशी आरोपींची नावे आहे.

या प्रकरणात लोहारा पोलिस ठाण्यात अपराध क्रमांक १०८/२०२० अन्वये भारतीय दंड विधान कलम ३०२ सह ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांच्या माहितीनुसार, २६ ऑगस्ट २०२० रोजी दुपारी यवतमाळ-लोहारा मार्गावर मारोती शोरूमजवळ देवीदास ऊर्फ देवा निरंजन चव्हाण हा कर्जाची रक्कम भरून घरी परतत असताना आरोपींनी कट रचून त्याच्या वाहनाला धडक दिली. तो खाली पडल्यानंतर त्याच्यावर धारदार शस्त्राने वार करून त्याची हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर फिर्यादी शरद बेंद्रे यांच्या तक्रारीवरून लोहारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सहाय्यक पोलिस निरीक्षक सचिन लुले आणि पोलिस उपनिरीक्षक संतोष जायभाय यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. खटल्याच्या सुनावणीदरम्यान सरकार पक्षातर्फे सात साक्षीदार तपासण्यात आले.

प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, फिर्यादी तसेच तपास अधिकाऱ्यांच्या साक्षी आणि सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे आरोपींविरुद्धचा गुन्हा सिद्ध झाला. त्यानुसार न्यायालयाने चारही आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता अ‍ॅड. यू. के. पांडे यांनी कामकाज पाहिले. फिर्यादीच्या वतीने अ‍ॅड. समीर गावंडे आणि अ‍ॅड. राजवर्धन गाडे यांनी सहकार्य केले. तपासामध्ये सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक जगदीश भगत यांचेही सहकार्य लाभले.

## शेतकऱ्यांना एक हजार कोटींच्या कर्जमुक्तीचे गिफ्ट

प्रतिनिधी २२ जुलै

**यवतमाळ** : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत जिल्ह्यातील एक लाख ४५ हजार शेतकऱ्यांचा समावेश आहे. या शेतकऱ्यांच्या खात्याचे अंकेक्षण केल्यानंतर अहवाल बाहेर येणार आहे. पहिली यादी जाहीर झाल्यानंतर किती शेतकरी कर्जमुक्तीला पात्र ठरले हे कळणार आहे. जिल्हा बँक आणि राष्ट्रीयीकृत बँकांनी एक लाख ४५ हजार पात्र शेतकऱ्यांचा अहवाल कर्जमुक्तीसाठी पाठविला आहे. या शेतकऱ्यांकडे एक हजार कोटींचे कर्ज थकले आहे. जिल्हा मध्यवर्ती बँकेतील ६४ हजार ८६५ शेतकऱ्यांच्या नावाची यादी सहकार आयुक्तालयाकडे अंकेक्षणासाठी पाठविण्यात आली.

राष्ट्रीयीकृत बँकांचे ८० हजार ३५४ शेतकरी कर्जमुक्तीला पात्र ठरणार आहेत. मात्र हे शेतकरी इन्कमटॅक्स, अथवा शासकीय नोकरी अथवा लाभाच्या पदावर आहेत काय, याची तपासणी केली जात आहे. जिल्हा मध्यवर्ती बँक आणि राष्ट्रीयीकृत बँकांकडे एक लाख ४५ हजार २१९ शेतकऱ्यांचे एक हजार कोटींच्या वर कर्ज थकले आहे. यातील किती कर्ज पात्र ठरणार यावर शेतकऱ्यांच्या दोन लाखांपर्यंतच्या कर्जमुक्तीचा लाभ अवलंबून राहणार आहे.

# 'दोन अटींचा घोटाळा की कोट्यवधींचा डाव?'

## मुख्याधिकाऱ्यांवर संतोष बोरेले यांचे गंभीर आरोप

प्रतिनिधी २२ जुलै

**यवतमाळ** : यवतमाळ नगर परिषदेतील घनकचरा व्यवस्थापनाच्या निविदेत सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या दोन महत्त्वाच्या अटी जाणीवपूर्वक वगळण्यात आल्याचा आरोप नगरसेवक संतोष बोरेले यांनी केला आहे. या निर्णयामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून ठेकेदारांना लाभ मिळावा, यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी संगनमताने काम केल्याचा गंभीर आरोप त्यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केला. तसेच मुख्याधिकाऱ्यांचा खुलासा वस्तुस्थितीला धरून नसून त्यात दिशाभूल करणारी माहिती देण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

बोरेले यांच्या म्हणण्यानुसार, १८ जून २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत घनकचरा निविदेसाठी दोन अटी एकमताने मंजूर करण्यात आल्या होत्या.

ठेकेदाराने कर्मचाऱ्यांच्या वेतनाची बँक स्टेटमेंटसह माहिती सादर करणे आणि नगर परिषदेकडून बिलास विलंब झाला तरी सहा महिन्यांपर्यंत कर्मचाऱ्यांचे वेतन स्वतःच्या निधीतून देणे बंधनकारक करण्याचा त्यात समावेश होता. मात्र, प्रत्यक्ष निविदेत या अटींचा समावेश करण्यात आला नसल्याचा आरोप त्यांनी केला.

या अटींची अंमलबजावणी झाली असती तर कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन, ईपीएफ, विमा आणि नियमित पगार मिळाला असता तसेच शहरातील स्वच्छता व्यवस्थाही सुधारली असती, असा दावा बोरेले यांनी केला. उलट या अटी वगळल्याने ठेकेदारांचे हित साधले जात असून शहरातील स्वच्छतेवर परिणाम होत असल्याचे त्यांनी म्हटले.

मुख्याधिकाऱ्यांनी पावसाळ्यापूर्वी मोठ्या नाल्यांची सफाई पूर्ण केल्याचा दावा केला असला तरी संबंधित कामाला मंजुरी व कार्यादेश नंतर देण्यात आल्याचे दस्तऐवज असल्याचा दावा बोरेले यांनी केला. तसेच शहरातील पॅचवर्कची कामेही जाणीवपूर्वक पावसाळ्यात सुरू करून निकृष्ट दर्जाची कामे करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

रेल्वे विभागाकडून प्राप्त निधीचा वापर घनकचरा व्यवस्थापनाच्या देयकांसाठी करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला. या निधीच्या विनियोगाला सर्वसाधारण सभेची मंजुरी नसताना नगरसेवकांच्या नावाचा आधार घेत दिशाभूल करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे प्रत्येक प्रभागातील विकासकामांवर परिणाम झाल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्याधिकाऱ्यांविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच केंद्रीय दक्षता आयोगाच्या (CVC) नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करणार असल्याचे बोरेले यांनी जाहीर केले. तसेच सार्वजनिक 'जनता दरबार' भरवून आपल्या आरोपांवर खुली चर्चा करण्याचे आव्हानही त्यांनी मुख्याधिकाऱ्यांना दिले. आरोप खोटे ठरल्यास आपण नगरसेवकपदाचा राजीनामा देऊ, अन्यथा मुख्याधिकाऱ्यांनी आपल्या कृतीची जबाबदारी स्वीकारावी, असे आव्हान त्यांनी दिले.

दरम्यान, या आरोपांवर नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणात पुढे कोणती प्रशासकीय किंवा कायदेशीर कारवाई होते, याकडे लक्ष लागले आहे.

# विनयभंग : आरोपीला शिक्षा

प्रतिनिधी २२ जुलै

**यवतमाळ** : बाभुळगाव पोलिस ठाण्यात दाखल विनयभंगाच्या प्रकरणात जिल्हा व विशेष न्यायालयाने आरोपी यशवंत महादेव होटे (वय ५३, रा. यवतमाळ) याला दोषी ठरवत एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमांतर्गतही दोष सिद्ध झाल्याने आणखी एक वर्षाची शिक्षा आणि एकूण ३० हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

जिल्हा न्यायाधीश १ तथा विशेष न्यायाधीश एस. यू. बघेले यांच्या न्यायालयात या प्रकरणाचा निकाल २० जुलै २०२६ रोजी जाहीर करण्यात आला. आरोपीविरोधात बाभुळगाव पोलिस ठाण्यात अपराध क्रमांक २६/२०२३ अन्वये भारतीय दंड विधान कलम ३५४ तसेच अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ मधील कलम ३(१)(डब्ल्यू)(i) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पीडित महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवण्यात आला होता. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलिस अधिकारी संपतराव भोसले यांनी करून आरोपीविरोधात न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. खटल्यात सरकार पक्षातर्फे सात साक्षीदार तपासण्यात आले. त्यामध्ये पीडित महिलेची साक्ष महत्त्वपूर्ण ठरली.

पीडित महिला अनुसूचित जातीची असल्याचे न्यायालयात सिद्ध झाल्याने आरोपीविरोधातील अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील गुन्हाही सिद्ध झाला. न्यायालयाने दोन्ही कलमांखाली प्रत्येकी एक वर्ष कारावास आणि प्रत्येकी १५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली. दोन्ही शिक्षा एकत्रित भोगण्याचा आदेशही न्यायालयाने दिला. सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी अभियोक्ता अ‍ॅड. यू. के. पांडे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. त्यांना पैरवी अधिकारी हवालदार संजय कासार यांनी सहकार्य केले.

# 'ग्रामगीतेचे विचार घराघरांत पोहोचले तर ग्रामविकासाला नवी दिशा' : गोपाल कडू

प्रतिनिधी २२ जुलै

## पुसदमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या चरण पादुका पालखीचे स्वागत




**पुसद** : आषाढी एकादशीनिमित्त गुरुकुंज आश्रम, मोझरी येथून निघालेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या चरण पादुका पालखीचे पुसद शहरात उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी केंद्रीय प्रचार विभागाचे प्रचार प्रमुख तथा पालखी संयोजक गोपाल कडू यांनी राष्ट्रसंतांच्या ग्रामगीतेतील विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवून ते आचरणात आणण्याची गरज व्यक्त केली.

छत्रपती शिवाजी महाराज चौकापासून विरंगुळा केंद्रापर्यंत भगवे झेंडे फडकवत मोटरसायकल रॅली काढण्यात आली. विरंगुळा केंद्रात चरण पादुकांचे पूजन, महाआरती आणि स्वागत सोहळा पार पडला. यावेळी डॉ. ज्ञानेश्वर मुडे, माजी आमदार अ‍ॅड. निलय नाईक, कृषिभूषण दीपक आसेगावकर, नीलेश महाराज गावंडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात पालखीसोबत सेवा देणाऱ्या १३ गुरुदेव अनुयायांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रा. प्रकाश लामणे यांनी केले, तर सूत्रसंचालन यशवंत देशमुख यांनी केले. यात्रेनिमित्त विरंगुळा केंद्र परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. तसेच रोटरी क्लब ऑफ पुसद आणि गुरुदेव सेवा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत आरोग्य तपासणी शिबिरात सुमारे १५० नागरिकांची मधुमेह व रक्तदाब तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी गुरुदेव सेवा मंडळ, पुसदच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# एपीआय अमोल गुंडे राज्यस्तरीय 'कर्मजीत' पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी २२ जुलै



**उमरखेड** : उमरखेड उपविभागातील वाहतूक शाखेचे प्रमुख तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) अमोल गुंडे यांना जनकल्याण बहुउद्देशीय फाउंडेशन, पुणे आणि आशुतोष डान्स स्टुडिओज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय 'कर्मजीत पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.

पुण्यातील महात्मा फुले सांस्कृतिक भवन, वानवडी येथे १९ जुलै रोजी आयोजित समारंभात लेफ्टनंट जनरल गोखले, निवृत्त पोलीस उपायुक्त शहाजीराव पाटील, सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट संमेलनाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. एपीआय अमोल गुंडे यांनी शासकीय सेवेत कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिक कार्यशैली आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत उल्लेखनीय कार्य केले आहे. लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असताना अपघातात जखमी झालेल्या व्यक्तीस ए-निगेटिव्ह रक्ताची तातडीची आवश्यकता असल्याचे समजताच त्यांनी स्वतः रक्तदान करून त्या व्यक्तीचा जीव वाचविला होता. त्यांच्या या सेवाभावी कार्याची दखल घेत तत्कालीन गृहमंत्री अनिल देशमुख यांनी त्यांचा "खाकी वर्दीतील देवमाणूस" असा गौरव केला होता. समाजाभिमुख कार्य, गरजूंना मदत करण्याची वृत्ती आणि कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी म्हणून त्यांनी केलेल्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत जनकल्याण बहुउद्देशीय फाउंडेशन व आशुतोष डान्स स्टुडिओज प्रतिष्ठानतर्फे त्यांना राज्यस्तरीय 'कर्मजीत' पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल पोलीस विभागासह विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जच्या निषेधार्थ २३ जुलैला महाराष्ट्र बंद

प्रतिनिधी २२ जुलै

**यवतमाळ** : दिल्ली येथे आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्जच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अ‍ॅड. बाळासाहेब आंबेडकर यांनी २३ जुलै रोजी महाराष्ट्र बंदचे आवाहन केले आहे. या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष डॉ. नीरज वाघमारे यांनी जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समविचारी राजकीय पक्ष, सामाजिक, विद्यार्थी, कामगार, शेतकरी, व्यापारी, कर्मचारी संघटना, युवक, महिला आणि संविधानवादी नागरिकांनी बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

डॉ. वाघमारे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात, शांततापूर्ण आंदोलन करणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार असल्याचे नमूद केले आहे. विद्यार्थ्यांवरील लाठीचार्ज हा लोकशाही, संविधान आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आघात असल्याचा आरोप करत या घटनेचा वंचित बहुजन आघाडीने निषेध व्यक्त केला आहे.

२३ जुलै रोजी यवतमाळ जिल्ह्यात महाराष्ट्र बंद शांततापूर्ण आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी पक्षाच्या पदाधिकारी व विविध आघाड्यांना नियोजनाच्या सूचना देण्यात आल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

तसेच, विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, कामगार, शेतकरी, व्यापारी आणि युवक संघटनांनी बंदमध्ये सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन डॉ. वाघमारे यांनी केले आहे. विद्यार्थ्यांवरील अन्यायाविरोधात आवाज उठविणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक आणि घटनात्मक जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# 'नयनतारा' उपक्रम; शालेय विद्यार्थ्यांच्या तीरळेपणावर मोफत शस्त्रक्रिया

प्रतिनिधी २२ जुलै



**यवतमाळ** : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून यवतमाळ जिल्ह्यात 'नयनतारा' हा विशेष आरोग्य उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत ५ ते १८ वर्षे वयोगटातील शालेय विद्यार्थ्यांमधील तीरळेपणा (स्क्विंट) शोधून त्यावर मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) अंतर्गत कार्यरत वैद्यकीय पथके जिल्ह्यातील शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी करणार आहेत. तपासणीदरम्यान तीरळेपणाची समस्या आढळलेल्या विद्यार्थ्यांना पुढील उपचारासाठी तज्ज्ञांकडे पाठविण्यात येईल. पात्र विद्यार्थ्यांवर यवतमाळ येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नेत्रसेवा प्रतिष्ठान, पुणेच्या तज्ज्ञ डॉक्टरांकडून संपूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा सर्व खर्च जिल्हा उपनिबंधक (सहकार) कार्यालयाकडून उचलण्यात येणार आहे. मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, जिल्हा प्रशासन, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग आणि आरबीएसके पथकांच्या संयुक्त विद्यमाने ही मोहीम राबविण्यात येणार आहे. तीरळेपणावर वेळेत उपचार झाल्यास मुलांची दृष्टी, आत्मविश्वास तसेच शैक्षणिक व सामाजिक विकासाला मोठी चालना मिळते. त्यामुळे सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि पालकांनी विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी करून घेण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. 'नयनतारा' उपक्रमाच्या माध्यमातून यवतमाळ जिल्हा तीरळेपणामुक्त करण्याचा संकल्प असून, प्रत्येक विद्यार्थ्याला निरोगी दृष्टी आणि उज्ज्वल भविष्य देण्याचा हा महत्त्वाचा प्रयत्न असल्याचे जिल्हाधिकारी विकास मीना यांनी सांगितले.

# उद्योजक डॉ. सतीश चिद्दरवार यांना 'विदर्भ रत्न २०२६' पुरस्कार

प्रतिनिधी २२ जुलै



**पुसद** : वैद्यकीय, शिक्षण आणि बांधकाम क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल पुसद येथील उद्योजक डॉ. सतीश चिद्दरवार यांना 'रिसिल ग्रुप'तर्फे प्रदान करण्यात येणाऱ्या 'विदर्भ रत्न २०२६' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नागपूर येथील सोलिटेर हॉटेल अँड बँक्वेट्स येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री वर्षा उसगांवकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

डॉ. चिद्दरवार यांनी वैद्यकीय सेवेसह शिक्षण, ले-आऊट विकास आणि गृहनिर्माण क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. 'सुखकर्ता नागरी' या उपक्रमांतर्गत पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून नागपूर येथे ९०० हून अधिक मध्यमवर्गीय कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या बहुआयामी कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा सन्मान प्रदान करण्यात आला.

यापूर्वीही डॉ. चिद्दरवार यांना 'जीवन गौरव', 'सुश्रुत जीवन गौरव' आणि 'आयकॉन्स ऑफ सेंट्रल इंडिया' यांसह अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. 'विदर्भ रत्न २०२६' पुरस्कारामुळे पुसदच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून विविध क्षेत्रांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# SIR प्रक्रियेला दोन महिन्यांची मुदतवाढ द्यावी

प्रतिनिधी २२ जुलै

## उमरखेडच्या लोकप्रतिनिधींची निवडणूक आयोगाकडे मागणी



**उमरखेड** : राज्यात सुरू असलेल्या विशेष सघन मतदार यादी पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रियेस ८ ऑगस्ट २०२६ ऐवजी आणखी दोन महिन्यांची मुदतवाढ द्यावी, अशी मागणी उमरखेड नगरपरिषदेच्या लोकप्रतिनिधींनी भारत निवडणूक आयोगाकडे केली आहे. या संदर्भातील निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्य निवडणूक आयुक्त आणि महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना सादर करण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राज्यात सध्या खरीप हंगामातील शेतीची कामे वेगाने सुरू असून मोठ्या प्रमाणात शेतकरी शेतात व्यस्त आहेत. तसेच आषाढी वारीनिमित्त अनेक वारकरी मूळ गावी नसल्याने मतदार पडताळणी प्रक्रियेत सहभागी होण्यास त्यांना अडचणी येत आहेत. त्यामुळे अनेक पात्र मतदार या प्रक्रियेपासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

याशिवाय, प्री-एसआयआर मॅपिंगचे काम अद्याप पूर्ण झाले नसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. शिक्षक आणि शासकीय कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण असून तांत्रिक अडचणींमुळे प्रक्रिया अपेक्षित वेगाने होत नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

मतदार अर्जांचे वितरण घाईगडबडीत न करता ते घराघरांत पोहोचविण्यात यावेत, तसेच अफवांना आळा घालण्यासाठी मराठी भाषेत अधिकृत माहितीपर व्हिडिओ आणि व्यापक जनजागृती मोहीम राबवावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

राज्यात सध्या कोणतीही तातडीची निवडणूक प्रस्तावित नसल्याने आणि १२ कोटी लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी पुनरावलोकनाची प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी आयोगाने दोन महिन्यांची मुदतवाढ द्यावी, असे निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनावर उमरखेड नगरपरिषदेचे उपाध्यक्ष जुबेर अ. समद कुरेशी, स्थायी समिती सदस्य म. साजीदउल्ला जागीरदार, शिक्षण सभापती शेख रसूल शेख वाहेद पटेल तसेच नगरसेवक अ. गणी शाह अनवर अली आणि शेख सिकंदर शेख इब्राहिम यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# दुचाकी अपघात; एसटी कर्मचाऱ्याचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी २२ जुलै



**उमरखेड** : उमरखेड-बाळदी मार्गावर झालेल्या भीषण दुचाकी अपघातात पुसद येथील एसटी महामंडळाच्या वर्कशॉपमध्ये कार्यरत असलेल्या २८ वर्षीय कर्मचाऱ्याचा जागीच मृत्यू झाला. डोक्याला गंभीर दुखापत होऊन मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे बाळदी गावावर शोककळा पसरली आहे.

वैभव संभाजी मिराशे रा. बाळदी, ता. उमरखेड असे मृतकाचे नाव आहे. ते पुसद येथील एसटी महामंडळाच्या वर्कशॉपमध्ये मेकॅनिकल कर्मचारी म्हणून कार्यरत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी रात्री सुमारे ११ वाजता वैभव मिराशे हे एमएच-२९-सीएस-०१६० क्रमांकाच्या दुचाकीने उमरखेडहून बाळदीकडे जात होते. दरम्यान, उमरखेड-बाळदी मार्गावर अज्ञात कारणामुळे त्यांच्या दुचाकीचा भीषण अपघात झाला. अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर मार लागून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला.

रात्री उशिरा अपघात झाल्याने त्यांना तातडीने मदत मिळू शकली नाही. मंगळवारी सकाळी या मार्गाने जाणाऱ्या नागरिकांच्या निदर्शनास अपघातग्रस्त युवक आल्याने त्यांनी तात्काळ उमरखेड पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वैभव यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना रुग्णालयात आणण्यापूर्वीच मृत झाल्याचे घोषित केले. मृतदेहाचे शवविच्छेदन उपजिल्हा रुग्णालयात करण्यात आले. या प्रकरणी मृताचे काका मोतीराम यादव मिराशे यांनी उमरखेड पोलीस ठाण्यात माहिती दिली असून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बीट जमादार दिलीप चव्हाण पुढील तपास करीत आहेत. मृत वैभव मिराशे यांच्या पश्चात आई-वडील आणि बहीण असा परिवार असून, त्यांच्या अकाली निधनामुळे कुटुंबासह संपूर्ण बाळदी गावात हळहळ व्यक्त होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
बुधवार, दि. २२ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# पंढरपुर विशेष रेल्वे गाडीला आ.रवी राणा व भाजपा नेत्या नवनीत राणा यांनी दाखविली हिरवी झेंडी

प्रतिनिधी २२ जुलै

**अमरावती :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेण्यासाठी जाणाऱ्या हजारो वारकऱ्यांसाठी विशेष रेल्वे गाडीचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष रेल्वे गाडीला अकोली रेल्वे स्थानकावरून आमदार रवी राणा व भाजपा नेत्या तथा माजी खासदार नवनीत राणा यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून उत्साहपूर्ण वातावरणात रवाना करण्यात आले.




यावेळी संपूर्ण रेल्वे स्थानक परिसर "जय हरी विठ्ठल","पांडुरंग हरी", "ज्ञानोबा-तुकाराम" अशा विठ्ठलनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला होता. वारकऱ्यांच्या चेहऱ्यावरील भक्तिभाव, टाळ-मृदुंगाचा गजर आणि विठ्ठल नामस्मरणामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले होते.

यावेळी आमदार रवी राणा व माजी खासदार नवनीत राणा यांनी श्री. विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक होत राज्यातील शेतकरी, कष्टकरी, वारकरी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सुख, समृद्धी, समाधान आणि भरभराट नांदो, तसेच महाराष्ट्रावर श्री विठ्ठलाची अखंड कृपादृष्टी राहो, अशी प्रार्थना केली.

माजी खासदार नवनीत राणा यांनी अकोली रेल्वे स्थानकावर उपस्थित असलेल्या वारकऱ्यांना तसेच रेल्वे गाडीत प्रवास करणाऱ्या भाविकांना स्वतः साबुदाणा खिचडीचे वाटप करून त्यांच्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. दरम्यान, स्थानकावर उपस्थित भजन मंडळाने विठ्ठलाच्या अभंगांनी वातावरण भक्तिरसात न्हाऊन काढले. युवा स्वाभिमान पक्षाचे मार्गदर्शक सुनील राणा यांनी वारकऱ्यांसोबत टाळ-मृदुंगाच्या साथीने भजनाचा आनंद घेत विठ्ठलनामाचा गजर केला. या प्रसंगी उपस्थित सर्वांनी भक्तिमय वातावरणाचा मनमुराद आनंद घेतला.

विशेष रेल्वेगाडी रवाना होताच वारकऱ्यांनी विठ्ठलनामाचा अखंड गजर करत पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान केले. संपूर्ण कार्यक्रम भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा सुंदर संगम ठरला.तसेच आ.रवि राणा यांनी रेल्वेगाडी चालक अतुल लोनसने, सहा.चालक सि.पी. झाडे व मॅनेजर नारायण कराडे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

यावेळी महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, YSP गटनेते नाना आमले, शिक्षण सभापती अँड.प्रिती बनारसे, नगरनगरसेवक प्रशांत वानखडे, अजय जयस्वाल, दिपक साहु सम्राट,योगेश विजयकर, स्विकृत नगरसेवक संजय तिरथकर, संजय हिंगासपुरे, किशोर जाधव, शैलेंद्र कस्तुरे, भाजपा नेते सुनिल खराटे, सोनाली नवले, राजु बन्नोरे, हेमंत जगले, मधुसुदन डागा नितीन बोरेकर, विनोद जायलवाल, अविनाश काळे उपस्थित होते.

# जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या निषेधार्थ युवक काँग्रेसचे तीव्र निदर्शन

प्रतिनिधी २२ जुलै




**अमरावती :** नवी दिल्ली येथील जंतर-मंतरवर आपल्या न्याय्य हक्कांसाठी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या कथित लाठीमार व वॉटर कॅननच्या वापराच्या निषेधार्थ अमरावती शहर युवक काँग्रेसच्या वतीने आज तीव्र आंदोलन करण्यात आले.

यावेळी युवक काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत विद्यार्थ्यांवरील दडपशाहीचा निषेध व्यक्त केला. "विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न लोकशाहीला शोभणारा नाही. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षण, रोजगार आणि न्याय्य हक्कांसाठी शांततापूर्ण पद्धतीने आंदोलन केले असताना त्यांच्यावर लाठीमार व वॉटर कॅननचा वापर करणे ही अत्यंत दुर्दैवी आणि निषेधार्ह बाब आहे," असे आंदोलनकर्त्यांनी म्हटले.

युवक काँग्रेसने आरोप केला की, देशातील तरुणाईच्या प्रश्नांवर उत्तर देण्याऐवजी सरकार दडपशाहीचा मार्ग अवलंबत आहे. विद्यार्थ्यांचा आवाज दाबण्याचा प्रत्येक प्रयत्न लोकशाही मूल्यांवर आघात करणारा असून, अशा कृतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र युवक काँग्रेस विद्यार्थ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी कायम त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी "विद्यार्थ्यांच्या सन्मानात, युवक कॉंग्रेस मैदानात", "लोकशाही वाचवा – विद्यार्थ्यांना न्याय द्या", "लाठी नव्हे, न्याय द्या", "धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या" अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. विद्यार्थ्यांवरील दडपशाहीचा निषेध करत संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात अमरावती विधानसभा युवक कॉंग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख, बडनेरा विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष आशिष यादव, राहुल साबळे, राहुल बागडे, संकेत साहू, अक्षय साबळे, प्रियाल मोहोड, अनय वाटाणे, रोशन इंगळे, अंकुश टोपले, आकाश धुराटकर, धनंजय बोबडे, अभिनव देशमुख, साहिल वानरे, अभिषेक भोसले, निशांत पवार, सम्यक वाकोडे, विवेक तायडे, ओम कुबडे, अभिषेक सवाई व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# रक्तदानाने रवींद्र सिंह सलुजा यांचा वाढदिवस साजरा

## सर्वपक्षीय नेत्यांची, व अधिकाऱ्यांची उपस्थिती

**अमरावती :** न्यू ईगल रेस्टॉरंट चे संचालक तथा ज्येष्ठ उद्योजक रवींद्र सिंह उर्फ बिट्टू भैया सलुजा यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर राबवून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



बिट्टू भैय्या यांच्या चहा त्यांनी जवळपास 100 जवळ रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे. रेल्वे स्टेशन चौकातील त्यांच्या न्यू ईगल रेस्टॉरंट मध्ये त्यांना भेटण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी, तसेच शहरातील महत्त्वाचे अधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाच्या टीमने रक्तदान शिबिरात सहभाग घेतला होता. रक्तदान समितीच्या वतीने शंभरच्या वर रक्तदात्यांनी या शिबिरात सहभाग नोंदवला होता. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या शाळेत आणि शहरात पोस्टर्स लावले होते. शांत,संयमी मनमिळाऊ असलेले व कोरोना काळातही गोरगरिबांना मदतीचा हात देणारे बिट्टू भैय्या सलुजा यांनी सर्वांचे आभार मानले. आज वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

# चिखलदरा येथे महाराजस्व समाधान शिबीर

प्रतिनिधी २२ जुलै

**अमरावती :** चिखलदरा येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. पोलीस कवायत मैदान येथे गुरुवार, दि. 23 जुलै रोजी सकाळी 11 वाजता हे शिबीर होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस, दिवंगत नेते अजितदादा पवार आणि आदिवासी योद्धा रेंगा कोरकू जयंतीनिमित्त शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबीरात चिखलदरा तहसील कार्यालयाच्या वतीने नागरिकांना विविध शासकीय दाखले आणि महसुली सेवा पुरवल्या जाणार आहेत.


प्रमाणपत्रे व दाखले यात प्रलंबित फेरफार मार्गी लावणे व सातबारामधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे सातबारा आणि आठ-अ उतारे. उत्पन्न, रहिवासी, जात आणि नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्रे व विद्यार्थ्यांसाठी विविध शासकीय दाखले देण्यात येणार आहे. जमीन अभिलेख अद्यावतीकरणात महिलांना शेतकरी दर्जा देणे व राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना, गावठाणातील नागरिकांना स्वामित्व सनद वाटप, मुख्यमंत्री बळीराजा शेत, पाणंद रस्ते योजना आणि शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमण नियमित करणे, जिवंत सातबारा मोहीम या सेवा दिल्या जाणार आहे. शासकीय योजनात सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करणे, नवीन रेशन कार्ड दुरुस्ती व वाटप, ई-मोजणी अर्ज, ॲग्रीस्टॅक आणि पी.एम. किसान नोंदणी करण्यात येणार आहे.

# रहाटगाव येथे 29 जूलै रोजी गुरुपौर्णिमा उत्सव निमित्त त्रिदिवसीय गुरुचरित्र पारायण

प्रतिनिधी २२ जुलै

**अमरावती :** गुरुपौर्णिमेनिमित्त श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र आरोग्य सेवा कॉलनी रहाटगाव येथे आषाढ पौर्णिमा शुक्रवार २९ जुलै रोजी परब्रम्ह श्री स्वामी समर्थांना गुरु करण्याचा व गुरु पूजनाचा भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये साप्ताहिक पारायण रविवार दिनांक २६ जुलै ते २८ जुलै पर्यंत

त्रिदिवसीय गुरुचरित्र पारायण होणार आहे. तरी सर्व भाविकांनी तसेच स्वामी समर्थ सेवेकऱ्यांनी दत्त जयंती सप्ताह व स्वामी पुण्यतिथी सप्ताह प्रमाणेच तीन दिवसीय पारायणाला बसायचे आहे.



बुधवार दिनांक २९ जुलै रोजी भूपाळी आरती नंतर सर्व सेवेकऱ्यांकडून श्री स्वामी सारांमृत पोथीचे हवनयुक्त सामूहिक पारायण होईल. यानंतर परब्रम्ह श्री स्वामी समर्थ महाराजांना गुरु करण्याचा संकल्प युक्त कार्यक्रम होणार आहे.

परब्रम्हांना गुरु करताना आपण ,"तुम्हीच आमचे गुरु परमगुरु आहात अशी मनोभावे विनंती करून संकल्प सोडण्यात येईल. त्यानंतर साडेदहा वाजता नैवेद्य आरती होवून सदर कार्यक्रम झाल्यानंतर दुपारी विनामूल्य प्रश्न उत्तराचा कार्यक्रम राहील. त्यामध्ये हस्तरेषा जन्म कुंडली पाहून मुला-मुलींचे लग्न, शिक्षण ,नोकरी, तसेच पितृदोष ,वास्तुदोष, असाध्य आजार इत्यादीवर सखोल मार्गदर्शन करण्यात येईल.

हवनयुक्त पारायण करण्याकरिता श्री स्वामी समर्थ सारामृत पोथी संकल्प सोडण्यासाठी पळी, पंचपात्र, ताम्हण, हार, प्रसाद, नारळ, विडा ,सोबत आणावे. सदर कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र रहाटगाव येथील आयोजक मंडळींनी केले आहे.

# विशेष लोक अदालतीमध्ये विविध प्रकरणांचा यशस्वी निपटारा

प्रतिनिधी २२ जुलै

## 4.13 कोटी रुपयांची तडजोड

**अमरावती :** जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती येथे नुकतेच विशेष लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले. या लोक अदालतीमध्ये प्रामुख्याने निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम 138 अंतर्गत येणाऱ्या 'धनादेश बाऊन्स' प्रकरणांवर तडजोडीसाठी भर देण्यात आला होता. संपूर्ण जिल्ह्यातून या उपक्रमाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

विशेष लोक अदालत पार पाडण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात एकूण 18 पॅनल (मंडळ) तयार करण्यात आले होते. या पॅनलमध्ये न्यायाधीश, वकील आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा समावेश होता. या लोक अदालतीसमोर एकूण 2 हजार 740 प्रलंबित प्रकरणे ठेवण्यात आली होती, त्यापैकी 229 प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. यामध्ये विशेष बाब म्हणजे 10 वर्षांपेक्षा जास्त काळ प्रलंबित असलेल्या 4 जुन्या प्रकरणांमध्येही दोन्ही पक्षांत तडजोड घडवून आणण्यात यश आले. या संपूर्ण प्रक्रियेतून एकूण 4 कोटी 13 लाख 45 हजार 372 रुपयांच्या तडजोडीच्या रक्कमेचे दावे निकाली काढण्यात आले.

लोक अदालती आयोजन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा उज्वला एम. नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांच्या नियोजनाखाली करण्यात आले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानासमोर आंदोलन

प्रतिनिधी २२ जुलै

## खासदार बळवंत वानखडे यांना अटक

**अमरावती :** राजधानी दिल्ली येथे आज राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या खासदार बळवंत वानखडे ( अमरावती लोकसभा ) यांच्या सह सर्व खासदारांनी राजाजी मार्गावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानाच्या दिशेने पायी मोर्चा काढला. पंतप्रधानांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी लोक कल्याण मार्गावर शांततापूर्ण धरणे आंदोलन सुरू असताना पोलिसांनी माझ्यासह अनेक काँग्रेस खासदारांना ताब्यात घेऊन अटक केली.



विद्यार्थ्यांवरील अत्याचार, दडपशाही आणि सरकारच्या भूमिकेविरोधातील हा संघर्ष आता संसदेपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो जनतेच्या आवाजासह रस्त्यावरही पोहोचला आहे. लोकशाहीत आंदोलनाचा आणि प्रश्न विचारण्याचा अधिकार हा संविधानाने दिलेला अधिकार आहे. अटक करून आवाज दाबण्याचा प्रयत्न होऊ शकतो, पण जनतेच्या प्रश्नांसाठीचा आमचा लढा थांबणार नाही.

# विशेष गौरव पुरस्कारासाठी माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांकडून अर्ज आमंत्रित

**अमरावती :** अमरावती जिल्ह्यातील माजी सैनिक, वीर पत्नी आणि त्यांच्या गुणवंत पाल्यांचा सन्मान करण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाच्या वतीने 'विशेष गौरव पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. शैक्षणिक आणि विविध क्षेत्रांत विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या पात्र उमेदवारांनी 1 सप्टेंबर 2026 पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनी केले आहे. या विशेष गौरव पुरस्कारासाठी काही प्रमुख निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार, ज्या माजी सैनिक किंवा वीर पत्नींच्या पाल्यांना इयत्ता 10 वीच्या परीक्षेत 90 टक्क्यांपेक्षा जास्त आणि इयत्ता 12 वीच्या परीक्षेत ८५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त झाले आहेत, ते या पुरस्कारासाठी पात्र ठरतील.

# शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज भरण्यास 22 जुलैपर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी २२ जुलै

**अमरावती :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाअंतर्गत जिल्ह्यात कार्यरत असलेल्या मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांमध्ये सन 2026-27 या शैक्षणिक वर्षाकरिता कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरण्यास दि. 22 जुलै 2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले आहे. वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांना शासनामार्फत सर्व सोयी-सुविधा मोफत पुरविल्या जातात. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी https://hmas-new.mahait.org या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन अर्ज भरणे अनिवार्य आहे. ऑनलाइन अर्ज पूर्ण केल्यानंतर त्याची प्रिंट काढून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित वसतिगृहामध्ये ऑफलाइन स्वरूपात अर्ज जमा करावा. निंभोरा येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह (युनिट क्र. 1, 2, 3 व निंभोरा) आणि संत गाडगे महाराज मुलांचे शासकीय वसतिगृह, तसेच मुलींकरिता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृहे आणि तालुका स्तरावरील वसतिगृहांमध्ये ही प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

# 26 जुलै रोजी दहावी-बारावीतील गुणवंत-यशवंत विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व सत्कार सोहळा

## लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती प्रित्यर्थ "जनसेवा सप्ताह " अंतर्गत आयोजन

**अमरावती :** दरवर्षी २२ जुलै रोजी अजितदादा पवार यांचा वाढदिवसानिमित्य अमरावती शहरात विविध<कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते. आज अजितदादा पवार आपल्यात नाही आहे. परंतु विकासाच्या प्रत्येक पाऊलावर अजितदादांच्या कामांची आठवण झाल्या शिवाय राहत नाही. त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्याचे नेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचा समावेश राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या अधिकृत जयंती कार्यक्रमांमध्ये केला आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती निमित्य दिनांक २२ जुलै ते २७जुलै २०२६ या कालावधीत "जनसेवा सप्ताह " निमित्याने लोकोपयोगी व समाजहिताचे विविध कार्यक्रम हाती घेऊन राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत येत्या रविवार दिनांक २६ जुलै २०२६ रोजी अमरावती येथे वर्ष २०२६ मधील दहावी-बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा स्थानिक श्री. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड अमरावती येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती अमरावतीच्या आमदार सुलभाताई संजय खोडके यांनी पत्रकार परिषदेतून दिली आहे.

यावर्षी स्व. अजितदादा पवार यांची जयंती समर्पण, सेवा आणि संकल्प या भावनेतून साजरी होत असून शहरात ग्रीन अमरावती ही संकल्पना राबवून २५ हजार वृक्ष लागवड हा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम हाती घेण्यात आला असून पर्यावरण संवर्धन व आरोग्याचे संरक्षण होण्याकरिता एक लोकचळवळ निर्माण करण्याचा संकल्प या माध्यमातून करण्यात आला आहे. शहरातील वृक्ष लागवड अभियानाचा शुभारंभ २२





जुलै रोजी शासकीय आयटीआय संस्था अमरावती येथून करण्यात येणार असून त्यानंतर जनसेवा सप्ताह अंतर्गत शहरात २५ हजार वृक्ष लागवड अभियान मोठ्या प्रमाणात राबविले जाणार असल्याची माहिती सुद्धा पत्रकार परिषदेतून देण्यात आली.

पत्रकार परिषदेत सांगण्यात आले कि, गेल्या वर्षी सुद्धा अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त दहावी -बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्या कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. दहावी व बारावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनाला नवे वळण देत असून येथूनच खरी उच्च शिक्षणाची व करियरची दिशा मिळते. म्हणून वर्ष २०२६ च्या दहावी-बारावीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी मिळविलेले सुयश हे त्यांच्या जिद्द, मेहनत व परिश्रमाचे फलित असून त्यांचा सत्कार करून प्रोत्साहित करणे हे समाजाचे कर्तव्य आहे. याच उदात्त भावनेतून सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला असून एका महिन्यापासून जय्यत तयारी करण्यात आली. शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष - यश खोडके यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत महानगरातील शाळा व कनिष्ठ

महाविद्यालयांकडून ७५ टक्केहुन अधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांची यादी प्राप्त करण्यात आली. तसेच परिचित व्यक्तीकडूनही त्यांच्या भागातील विद्यार्थ्यांची नावे सुचविण्यात आली असल्याने बहुसंख्य गुणवंत विद्यार्थ्यांची नाव नोंदणी करण्यात आली आहे. तसेच त्यांना कार्यक्रमासंदर्भात कळविण्यात आले असून कार्यक्रमस्थळी सुद्धा गुणवंत विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणीसाठी स्टॉल लावण्यात येईल. या सोहळ्यामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना आकर्षक भेटवस्तू, प्रशस्तीपत्र तसेच वृक्ष देऊन गौरविण्यात येणार असून भविष्यातील शैक्षणिक वाटचाल व शिक्षणाच्या नवनवीन संधी याबाबत सुद्धा मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने येणाऱ्या सर्व विद्यार्थी व पालकांसाठी कार्यक्रमस्थळी जलपान, चहा व अल्पोपहाराची सुद्धा व्यवस्था करण्यात आली आहे. वर्ष २०२६ मधील इयत्ता दहावी व बारावीतील ७५ टक्के हुन अधिक गुण संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी तसेच त्यांच्या पालकांनी या सत्कार सोहळ्याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ. सुलभा खोडके यांनी पत्रकार परिषदेतून केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
बुधवार, दि. २२ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



हाच तो नमुना 'ड'


शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून अतिक्रमण
शासकीय जागेवर अतिक्रमण, जिल्हाधिकाऱ्यांनी करावे भ्रमण!
गरीबांचे काढतात, श्रीमंतांचे सोडतात!
गरीब, श्रीमंत असा भेदभाव करतात
वसतीगृहाच्या नावावर कोट्यवधीची फसवणूक
नियमाला हरताळ, कारवाईस टाळाटाळ!

## राजस्थान आर्य महाविद्यालयाच्या अतिक्रमित जागेत बनवाबनवीची हद्द,

# 'त्या' वादग्रस्त जागेचा नमूना 'ड' रद्द!

## 'राजाश्रय' असलेल्या संस्थाचालकांना भूमि अभिलेख कार्यालयाचा दणका

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

येथील राजस्थान आर्य महाविद्यालयाने शासकीय जागेवर अतिक्रमण करुन बेकायदेशिर बांधकाम केलेल्या जागेचा वादग्रस्त नमूना 'ड' २२ नोव्हेंबर २०२२ रोजी उपअधीक्षक भूमि अभिलेख,वाशीम यांच्या आदेशान्वये रद्द करण्यात आला आहे. या आदेशामुळे वसतीगृहाची कोट्यवधीची ईमारत शासनाने ताब्यात घेण्यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यक्ता आहे. जिल्हाधिकारी आणि महसूल प्रशासन 'या' जागेबाबत कोणती भूमिका घेणार याकडे जागरूक नागरिकांचे लक्ष लागले आहे.





वाशीम येथील जवाहर नवोदय विद्यालयाला लागूनच असलेल्या शासकीय जागेवर राजस्थान महाविद्यालयाने अतिक्रमण करून प्ले ग्राऊंड केले होते. ही शासकीय जागा बाजारभावाने कोट्यवधीची होती.परंतु राजस्थान महाविद्यालयाच्या माजी दिवंगत अध्यक्षांना 'राजाश्रय' होता.तसेच त्या दिवंगत अध्यक्षांचे वडील माजी आमदार होते.वडीलांची ' पुण्याई 'आणि ' बारामतीकरांसोबत ' असलेल्या संबंधामुळे या संस्थेला राजाश्रय होता,हे सर्वश्रुत आहे.

राजस्थान शिक्षण प्रसारक मंडळाचे दिवंगत अध्यक्ष सुभाष राठी असतांना या संस्थेचा कारभार 'धुर्त'म्हणून ख्याती असलेल्या एका व्यापाऱ्या कडे होता.योगायोगाने स्थानिक राजस्थान महाविद्यालयात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार महाविद्यालयातील सर्व शाखेसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधा उपलब्ध असल्याने 'या' महाविद्यालयाला नॅकचा 'अ' वर्गाचा दर्जा प्राप्त झाला होता.काही वर्षांनी पुन्हा नॅक समितीने ए प्लस चा दर्जा बहाल केला. या संधीचे सोने करून अतिक्रमण केलेल्या शासकीय जागेवर मुलींचे वसतीगृह बांधण्याचा धुर्त कारभाऱ्याने आखला. मुलींच्या वसतीगृहासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने राजस्थान महाविद्यालयाला कोट्यवधी रूपयाचा निधी दिला.महाविद्यालयाकडे मुलींचे वसतीगृह बांधण्यासाठी संस्थेच्या मालकीची जागा उपलब्ध नसल्याने संस्थेच्या कथित संचालकांनी शासकीय जागेवर अतिक्रमण केलेल्या जागेवरच टोलेजंग मुलींचे वसतीगृह बांधण्याचा संकल्प केला. मुलींचे वसतीगृह बांधताना संबंधित जागेच्या मालकी हक्काबाबतचे सर्व आवश्यक कागदपत्रे, अकृषक परवाना,नगर रचना विभागाची मंजूर असलेल्या बांधकामाची परवानगी,वाशीम नगर पालिकेची बांधकामाची परवानगी,बांधकामाचा मंजूर केलेला नकाशा असे महत्वाचे कागदपत्रे आवश्यक असतात. विद्यापीठ अनूदान आयोगानेसुद्धा कोट्यवधीचा निधी राजस्थान महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतीगृहासाठी देतांना आवश्यक असलेली कागदपत्रे न पाहताच निधी दिला की 'या' संस्थेचा बनावटपणा माहित असतांना चिरीमिरी घेवून धृतराष्ट्राची भूमिका घेतली असा प्रश्नही जाणकारांकडून उपस्थित केल्या जात आहे.

शासकीय जागेवर अतिक्रमण करून सुरुवातीला प्ले ग्राऊंड आणि नंतर मुलींचे वसतीगृह बांधलेल्या जागेची नोंद वाशीम शहरामध्ये नगर भूमापन क्रमांक २३ , सिट नंबर २७ आणि प्लॉट नंबर २३ अशी नमूना 'ड' मालमत्ता पत्रकामध्ये नमूद आहे.ही जागा राजस्थान शिक्षण प्रसारक मंडळाद्वारे संचालित राजस्थान आर्य महाविद्यालयाच्या मालकीची नसतांना सरकारी जागेवर मुलींच्या वसतीगृहाचे बेकायदेशीर बांधकाम केल्याची बाब काही जागरूक नागरिकांच्या लक्षात आली.या बनावट प्रकरणाबाबत जिल्हाधिकारी आणि महसूल विभागाच्या वरिष्ठांकडे तक्रारी झाल्यात.या तक्रारीमुळे कथित संचालकांनी त्यांचे राजकीय वजन वापरुन दिनांक ६ मे २०१५ रोजी जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य ,पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.ना.भू.१/ मि.प./ अक्षरी नोंद/२०१५ पुणे दिनांक १६ फेब्रुवारी २०१५ आणि उपअधीक्षक भूमि अभिलेख यांचा ईकडील आदेश क्र,न.भू.वाशीम/ फे.क्र. ७३९७ दि.६ मे २०१५ अन्वये केवळ चौकशी नोंदवहीवरील क्षेत्र व मिळकत पत्रिकेवरील क्षेत्र मेळात असल्याने मिळकत पत्रिकेवर नमूद अंकी क्षेत्र अक्षरी दहा हजार दोनशे एक्यांशी चौरस मिटर दाखल केले.अशी नोंद करण्यात आली. हे वादग्रस्त प्रकरण विधानसभेतही गाजले.नंतर या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश महसूल प्रशासनासह येथील जिल्हाधिकाऱ्याना देण्यात आलेत.शेवटी २८ नोव्हेंबर २०२२ रोजी आदेश आणि नोंद- उपअधीक्षक भूमि अभिलेख,वाशीम यांचेकडील आदेश क्रमांक : क्र./ न.भू./पुनर्विलोकन/२३/ मौजा वाशीम/ २०२२ दिनांक :२१ नोव्हेंबर २०२२ अन्वये हॉस्टेल ही नोंद रद्द करण्यात आली असे मालमत्ता पत्रकात नमूद केलेले आहे. या बनवाबनवीच्या प्रकरणातून राजस्थान महाविद्यालयातील कथित संचालकमंडळीचा गैरप्रकार उघडकीस आला आहे.

तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाचाही आंधळेपणा 'या' प्रकरणाने चव्हाट्यावर आला आहे.या बनावट प्रकरणाबाबत दै.सिटी न्युज सुपरफास्ट ने यापुर्वीसुद्धा वृत्तमालिका प्रकाशित करुन महसूल प्रशासनाच्या अनागोंदी कारभारावर प्रहार केला होता.आता पुन्हा या वादग्रस्त प्रकरणासह विद्यापीठ अनुदान आयोगाच्या धृतराष्ट्राच्या भूमिकूबाबतही आसूड ओढून या प्रकरणात संगनमत करून शासनाची फसवणूक करणाऱ्यां सर्व धुर्त मंडळी, अधिकारी, कर्मचारी मंडळींवर कठोर कारवाई करण्यासाठी सिटी न्युज सुपरफास्ट वृत्त मालिकेतून पाठपुरावा करणार आहे.

### महसुलमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र भ्रष्ट कर्मचाऱ्यांचे टाळाटाळीचे सत्र...

१३ वर्षापासून राजस्थान आर्य शिक्षण संस्थेने अनाधिकृत ताब्यात घेतलेली महसुल प्रशासनाची जागा ताब्यात घ्यावी असे पत्र तत्कालीन महसुल मंत्री व जिल्हाधिकारी व आताचे महसुल मंत्री व जिल्हाधिकारी यांनी प्रशासनाला दिले आहे. मात्र प्रशासनात असलेल्या भ्रष्ट अवगुण असलेल्या धुर्त कर्मचाऱ्याने आर्थिक देवाण घेवाण करून टाळाटाळीचे सत्र सुरू ठेवले आहे. महसुल मंत्र्याच्या व जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्राला लालफितीत ठेवणाऱ्या भ्रष्टअधिकाऱ्यावर कारवाई करून जागा ताब्यात घ्यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे यांनी केली आहे.

## थोडक्यात

### मंगरुळपीर येथे शहिदांना मानवंदना

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर येथील मिलिंद नगर येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी माझी सैनिक संघटनेच्या वतीने कारगिल युद्धातील शहिदांना मानवंदना दि. २६ जुलै २०२६ रोजी देण्यात येणार आहे.



सन, २६ जुलै १९९९तबल (८५ दिवस ) चालल्या या युद्धा मध्ये अनेक सैनिक शहीद झाले कार्यक्रमाचे औचित्य साधून मिलीद नगर मध्ये दरवर्षी प्रमाणे याही वर्षी शहिदांना मानवंदना देण्यात येईल, त्यांच्या आठवणीला उजाळा मिळावा कारण दिनांक ३ मे पासून २६ जुलै १९९९ मध्ये चालले या तुंबळ युद्ध मध्ये देशातील अनेक जवानांनी प्राणाची आहूती दिली, या कार्यक्रमाला सर्व समाज बांधव आजी-माजी सैनिक समता सैनिक दल,व राजकीय क्षेत्रातील मंडळींनी उपस्थित राहून शहिदांना मानवंदना द्यावी. असे आवाहन नंदकिशोर मनवर यांनी केले आहे.

### जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विकसित भारताच्या निर्मितीत युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, शासनाच्या विविध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवकांनी 'माय भारत' पोर्टलवर नोंदणी करावी, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित माय भारत केंद्राच्या जिल्हास्तरीय सल्लागार समितीच्या बैठकीत अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.यावेळी जिल्हा युवा अधिकारी मयूरकुमार गोरमे, 'मेरा युवा भारत'चे कार्यक्रम अधिकारी अनिल ढेंगे, माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धूपे,राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक अशोक वाघ, एनसीसी अधिकारी अमोल काळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत तसेच राजस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य ओमप्रकाश झंवर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# पॅकिंगवर नाही उत्पादन तिथी, ग्राहकांच्या आरोग्याची माती !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यातील मंगरुळपिर तालुक्यात येत असलेल्या शेलुबाजार येथील STRESSVURE SOFT DRINKS AND MINERAL WATER PVT.LTD. कंपनीच्या लेमन सोडा बाटलीवर उत्पादन तारीखच नसल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्यामूळे सदर उत्पादक कंपनी ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ खेळत असल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे. या खळबबळजनक प्रकरणाची चौकशी अन्न व औषध प्रशासन विभाग करणार का ? असा सवाल उपस्थित होत आहे.






### शेलुबाजार येथील 'लेमन सोडा' प्रकरणाच्या चौकशी ला देणार का गती

मंगरूळपिर तालुक्यात येत असलेले शेलुबाजार हे मुंबई - नागपूर महामार्गावर असलेले एक महत्त्वपूर्ण बाजाराचे ठिकाण आहे. आसपासच्या अनेक गावांचे हे मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथे अनेक लहान मोठे उद्योग व्यवसाय भरभराटीस आले आहेत. उपरोक्त सॉफ्ट ड्रिंक्स कंपनी सुद्धा ' लेमन सोडा ' उत्पादक म्हणून नावारूपास आली आहे. मात्र सदर कंपनी उत्पादीत करत असलेल्या लेमन सोडा बाटलीवर उत्पादन तारीखच दर्शवित नसल्याचे पुरावे समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे. उन्हाळ्यात लहान मुले, शालेय विद्यार्थी आणि वयोवृद्ध हे मोठ्या आवडीने सोडा पितात. पण बाटलीवर उत्पादन तारीखच नसेल तर एक्सपायर झाले आहे का हे कसे कळणार ? परिणामी ग्राहकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते अशी सर्वत्र चर्चा होत आहे. हा सदर उत्पादक कंपनीचा निष्काळजीपणा आहे की जाणीवपूर्वक ' काळाबाजार ' आहे हे पाहणे खुप गरजेचे झाले आहे. त्यामुळे वाशिमचा अन्न व औषध प्रशासन विभाग या प्रकरणाची चौकशी करणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष वेधले जात आहे. बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असलेल्या २०० मी.ली. बाटलीवर इएऐंघलायसन्स क्रमांक असूनही उत्पादन तारीख, बॅच नंबर आदींची जागा कोरी ठेवण्यात आली असल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. मात्र या अक्षम्य प्रकाराकडे सबंधित प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करुन सर्वसामान्यांच्या आरोग्याशी सुरू असलेला खेळ आता तरी थांबवावा अशी मागणी जोर धरत आहे.


मंगळवार, दि. २१ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
लेमन सोडा बाटलीवर नाही एक्सपायरी डेट, कारवाई करा थेट !
*शेलुबाजार येथील अक्षम्य प्रकार *अन्न व औषध प्रशासन काय कारवाई करणार ?

**कायदा धाब्यावर..**

अन्न सुरक्षा कायद्यानुसार प्रत्येक पेयावर व खाद्यपदार्थांच्या पॅकिंगवर उत्पादन तिथी आणि अंतिम तारीख लिहिणे बंधनकारक आहे. सदर नियमांचे काटेकोरपणे पालन न केल्यास एक लाख रुपये दंड आणि सहा महिने कैदेची तरतूद आहे. तरीही कायदा धाब्यावर बसवून सर्रासपणे बिन - तारखेच्या बाटल्या विकल्या जात आहेत. अशा गंभीर प्रकरणावर कायद्याचा वचक असणे गरजेचे आहे.

**प्रशासन कारवाई करणार का ?**

या अक्षम्य प्रकरणात अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम चौकशी करणार का ? आणि दोषी कंपनी व सबंधित विक्रेत्यांवर कठोर कारवाई होणार का ? असा सवाल सामान्य नागरिक उपस्थित करत आहेत.

## स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त शासकीय कार्यालयांना प्रतिमांचे वितरण

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

महाराष्ट्र शासनाने स्वर्गीय अजितदादा पवार यांचा महापुरुषांच्या यादीत समावेश करून त्यांच्या जयंतीनिमित्त राज्यभर शासकीय स्तरावर जयंती साजरी करण्याबाबत शासन निर्णय (जी.आर.) जारी केला आहे. या पार्श्वभूमीवर वाशीम जिल्हाधिकारी कार्यालय येथे निवासी उपजिल्हाधिकारी (ॅअ) श्री. विश्वनाथ घुगे यांना तसेच नगर परिषद व इतर शासकीय कार्यालयांसाठी स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे स्वप्नील गव्हाळे यांच्या हस्ते भेट देण्यात आल्या.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त वाशीम



शहरात वृक्षारोपण, रक्तदान शिबिर तसेच विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. हे सर्व उपक्रम वाशीम जिल्ह्याचे मा. पालकमंत्री दत्तात्रेय भरणे (मामा), माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांतदादा ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. असे आवाहनही स्वप्नील गव्हाळे यांनी केले.

## मंगरूळपीर येथे बीएलए २ मार्गदर्शन व कार्यकर्ता मेळावा !

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर येथील सांस्कृतिक भवन मध्ये स्वर्गीय अजित दादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बी एल ए २ विषय मार्गदर्शन व राष्ट्रवादी काँग्रेस च्या वतीने कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीत लोकनेते माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे हे उपस्थित होते.




### लोकनेते सुभाषराव ठाकरे यांची प्रमुख उपस्थिती

राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी अध्यक्ष चंद्रकांत दादा ठाकरे यांनी आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादी विशेष सखोल पुनर्निरीक्षण (एर्ङ) आणि बी.एल.ए. यांच्या जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.कार्यशाळेत उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मतदार यादीतील त्रुटी दूर करणे, नवमतदार नोंदणी, नावां मध्ये दुरुस्ती, मतदारांशी नियमित संपर्क तसेच बूथ स्तरावरील संघटन अधिक सक्षम करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

प्रत्येक बी.एल.ए.ने आपल्या बूथवर प्रभावीपणे काम करून मतदार यादी अचूक ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.या प्रशिक्षण कार्यशाळेस तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यसरपंच, उपसरपंच सदस्य , कृषी उत्पन्न बाजार समिती खरेदी विक्री संघ ,जिनिंग प्रेसिंग यशवंतराव चव्हाण विद्यालय महाविद्यालयातील शिक्षक वृंद, मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. तसेच या निमित्ताने उपस्थितिनी लोकनेते सुभाषराव ठाकरे साहेब यांच्याशी संवाद साधून स्नेह भेट घेतली आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याचा निर्धार सुद्धा चंद्रकांत दादा ठाकरे यांनी व्यक्त केला.

# अजंता फार्मा लिमिटेड नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

सामाजिक बांधिलकी आणि सेवेचा वसा जपत मुंबई येथील अजंता फार्माचे सर्वेसर्वा श्री मन्नालाल जी अग्रवाल यांनी केलसुला येथील गंगोत्री वृद्धाश्रम व माँ गंगा गोरक्षण केंद्र येथे विकासकामांचा शुभारंभ करत वॉल कंपाऊंड व पेव्हर ब्लॉकचे काम पूर्ण केले आहे. संत अमरदास अर्बन बँक रिसोड मुख्य शाखेचे अध्यक्ष उत्तमचंदजी बगडिया यांच्या विशेष मध्यस्थीने व पाठपुराव्याने या संपूर्ण परिसरामध्ये पेवर ब्लॉक बसवणे आणि सिमेंट वॉल कंपाऊंड उभारणीचे काम अत्यंत दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाले आहे. या सुविधेमुळे वृद्धाश्रमातील वृद्ध नागरिक आणि गोरक्षण केंद्राच्या सुरक्षेचा व सुशोभीकरणाचा प्रश्न कायमचा मार्गी लागला आहे.






सुरक्षा आणि सुशोभीकरणाला प्राधान्य देत केलसुला येथील गंगोत्री वृद्धाश्रमात अनेक निराधार वृद्ध आश्रयाला आहेत, तर माँ गंगा गोरक्षण केंद्रात मोठ्या संख्येने गोवंशाचे पालन केले जाते. या संपूर्ण परिसराची सुरक्षा मजबूत व्हावी आणि पावसाळ्यात चिखल किंवा अस्वच्छता होऊ नये, यासाठी येथे पक्के सिमेंट वॉल कंपाऊंड आणि दर्जेदार पेवर ब्लॉक बसवण्याची अत्यंत गरज होती. हीच निकड ओळखून उत्तमचंदजी बगडिया यांनी मुंबई येथील उद्योगपती व दानशूर व्यक्तिमत्त्व श्री मन्नालाल जी अग्रवाल यांच्याकडे हा प्रस्ताव मांडला होता. माध्यमातून या प्रस्तावाला तातडीने मंजुरी देत सन्माननीय शेठ अग्रवाल यांनी या कामासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला.परिसराचा पालटला कायापालट उत्तमचंदजी बगडिया यांच्या थेट देखरेखीखाली हे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यात आले. संपूर्ण आश्रमाच्या अवतीभवती आता भक्कम सिमेंट वॉल कंपाऊंड उभारण्यात आले आहे, ज्यामुळे परिसराची सुरक्षा कमालीची वाढली आहे.

तसेच, वृद्धाश्रमाच्या व गोरक्षण केंद्राच्या संपूर्ण प्रांगणात आकर्षक आणि मजबूत पेवर ब्लॉक बसवण्यात आले आहेत. यामुळे आता वयोवृद्ध नागरिकांना परिसरात चालणे-फिरणे सुलभ झाले असून, संपूर्ण परिसराला एक स्वच्छ आणि देखणे स्वरूप प्राप्त झाले आहे.

### गंगोत्री वृद्धाश्रम व गोरक्षण परिसराचा केला विकास

सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षावअजंता फार्माचे श्री मन्नालाल जी अग्रवाल यांचे औदार्य आणि संत अमरदास बँक मुख्य शाखा चे अध्यक्ष उत्तमचंदजी बगडिया यांनी घेतलेले कष्ट यामुळेच हे लोकोपयोगी काम यशस्वीरीत्या पूर्णत्वास आले आहे.

या कौतुकास्पद आणि सेवाभावी कार्याबद्दल गंगोत्री वृद्धाश्रम व्यवस्थापन, केलसुला ग्रामस्थ, गोरक्षक आणि रिसोड परिसरातील नागरिकांकडून अजंता फार्मा असून, सर्वस्तरातून या कामाचे उत्स्फूर्त कौतुक होत आहे.

## मेडशी वन विभागाचा लाकूड डेपो 'रामभरोसे' !

### रेंजर कायम गैरहजर, सरकारी मालमत्ता धोक्यात

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मेडशी येथील वन विभागाच्या लाकूड डेपोमध्ये प्रशासनाच्या कथित निष्काळजी कारभारामुळे लाखो रुपयांची सरकारी मालमत्ता अक्षरशः रामभरोसे असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. डेपोचे प्रभारी रेंजर सातत्याने गैरहजर राहत असल्याने डेपोची सुरक्षा, देखभाल आणि दैनंदिन व्यवस्थापनावर गंभीर परिणाम होत असून, या प्रकाराची वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, अशी जोरदार मागणी परिसरातून होत आहे.

मेडशी येथील वन विभागाच्या या डेपोमध्ये वन विभागाचे गोला लाकूड,



आदिवासी बांधवांचे गोला लाकूड, विविध कारवायांमध्ये जप्त करण्यात आलेल्या दुचाकी, तीनचाकी, ट्रक तसेच इतर अनेक सरकारी साहित्य व मालमत्ता ठेवण्यात आलेली आहे. या सर्व मालमत्तेची किंमत लाखो रुपयांच्या घरात असल्याचे सांगितले जात असून, तिच्या सुरक्षेची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर असतानाही प्रत्यक्षात डेपोवर प्रभावी नियंत्रण नसल्याचे चित्र दिसून येत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड ८

बुधवार, दि. २२ जुलै २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com

# शहरात बीएलए नियुक्तीत भाजपाची आघाडी अन्य पक्षाचे बीएलए गायब

## नगरसेवकांच्या कार्यालयात बसून गणनाप्रप्रपत्र भरण्याचे काम सुरू

प्रतिनिधी 22 जुलै

**अकोला:** सध्या राज्यात मतदार विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम सुरू आहे. जिल्ह्यातही भाजप, शिवसेना, काँग्रेस सह अन्य राजकीय पक्षांकडून या निमित्ताने जनसंपर्काची संधी साधण्यात येत आहे. अकोला शहरातही सर्व मतदान केंद्रावर सर्वच राजकीय पक्षांचे बीएलए नियुक्त आहेत. परंतु एकाही राजकीय पक्षाला शंभर टक्के बीएलए नियुक्त करता आले नाही. या सर्वांमध्ये अधिकांश मतदान केंद्रांवर फक्त भाजपाचे बीएलए मतदारांशी संपर्क साधताना व त्यांना मदत करताना दिसून येत आहेत. भाजपने बीएलए नियुक्तीत सर्व पक्षांपेक्षा आघाडी घेतली आहे. यात मात्र विरोधक सुस्त असल्याचे दिसून येत आहे.

एसआयआर मोहीम यशस्वी करण्यासाठी निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना सहभागी करून घेतले आहे. प्रत्येक मतदान केंद्रावर बीएलओंच्या मदतीसाठी राजकीय पक्षांनी बीएलए नियुक्त केले आहेत. परंतु कोणत्याही पक्षाला मतदान केंद्रांवर १००ब बीएलए नियुक्त करता आले नाहीत. मतदारांची पडताळणी करण्यासाठी या सर्व बीएलए ना निवडणूक आयोगाने मतदार यादया सुद्धा दिल्या आहेत. महायुतीतर्फे भाजपाचे सर्वात जास्त बीएलए मतदान केंद्रांवर दिसून येत आहेत. तर महाविकास आघाडी तर्फे काही मतदान केंद्रांवर काँग्रेस आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे बीएलए दिसून येत आहेत. मात्र अन्य पक्षांचे बीएलए मात्र कुठेच दिसून येत नसल्याने अनेक मतदारांना आपले नाव मतदार यादीत दिसत नसल्याने व गणना प्रपत्र भरण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकांना काहीच समजत नसल्याने व मार्गदर्शन मिळत नसल्याने अनेकांनी गणना प्रपत्र भरणेच सोडून दिले आहे. भाजपा वगळता अन्य राजकीय पक्षांतर्फे मतदारांना मार्गदर्शन मिळत नसल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. कारण अनेकदा बीएलओ नागरिकांना मिळत नसल्याने तसेच राजकीय पक्षांचे बीएलए सुद्धा दखल घेत नसल्याने गणना प्रपत्र भरण्याचे मोठे संकट मतदारांसमोर उभे ठाकले आहे.

### नगरसेवकांच्या कार्यालयात बसून चालवत आहेत काही बीएलओ कारभार

» एसआयआर अंतर्गत सध्या बीएलओ मतदारांचे गणाला प्रपत्र भरून घेत आहेत प्रभाग व मतदार केंद्र परिसरात धार्मिक स्थळ राजकीय पक्ष्यांच्या कार्यालयात बसून काम टाळावे असे निवडणूक आयोगाचे आदेश असताना सुद्धा काही बीएलओ नगरसेवकांच्या कार्यालयात बसून फॉर्म भरून घेत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत

# पाऊस झाल्यावर फेसाळली मोर्णा नदी

## पाण्यावरील तवंग व फेसामुळे येत आहे दुर्गंधी

प्रतिनिधी 22 जुलै



**अकोला:** दोन आठवड्याच्या प्रतीक्षेनंतर पावसाने जिल्ह्यात हजेरी लावली आहे मंगळवारी शहरात जोरदार पाऊस झाल्यानंतरही मोरणा नदीच्या पाण्याची पातळी वाढण्याऐवजी नदीपात्रातील पाण्यात पांढरा फेस दिसून येत आहे गेल्या काही दिवसांपासून मोरणा नदी पात्रातील हा फेस पाहून नदीपात्रात बर्फ सदृश्य चित्र पहावयास मिळत आहे पाण्यातील तवंग व फेसामुळे पाण्याची दुर्गंधी पसरली आहे. पाण्यावर पांढरा फेस दिसतात परिसरातील नागरिकांनी महापालिकेशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु अद्याप कोणीही प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी केली नाही पांढरे स्वच्छ रंगाच्या केसाचे थर नदीपात्रात जमा झाल्याने किनारी उग्र वास येऊ लागल्याने त्रास जाणू लागल्याची तक्रार नागरिकांनी केली परंतु अद्यापही नागरिकांचे शंका निरसन झालेले नाही.

### लोकसहभागातून नदी स्वच्छ करण्याच्या मोहिमेला फासला हरताळ

» मागील काही दिवसापूर्वी भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिवसानिमित्त लोकसभागातून नदी स्वच्छ करण्यात आली होती परंतू आता शहरातील राजेश्वर सेतूपाशी मोठ्या प्रमाणात जलकुंभी जमा झाली आहे. त्यामुळे पूर आल्यास पाण्याचा प्रवाह बदलण्याची भीती निर्माण झाली आहे अशातच आता नदीच्या पाण्यात पांढरा फेस दिसून येत असल्याने व त्याची दुर्गंध सुटल्याने लोकसहभागातून राबवलेल्या स्वच्छता मोहिमेला या प्रकारामुळे हरताळ फासला असल्याचे चित्र दृष्टीस पडत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे

# अकोला जिल्ह्यात मुसळधार पाऊस

प्रतिनिधी 22 जुलै


### 23 जुलैपर्यंत अलर्ट जारी

**अकोला:** अकोला जिल्ह्यात अखेर पावसाने आज दमदार हजेरी लावली आहे. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे सुकणाऱ्या पिकांना मोठा दिलासा मिळाला असून, येत्या २३ जुलैपर्यंत पावसाचा हा जोर कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. जून महिना कोरडा गेल्यानंतर अकोला जिल्ह्यातील शेतकरी आणि नागरिक चिंतेत होते. पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि सुकणारी पिके यामुळे सर्वजण पावसाची वाट पाहत होते. आज मंगळवारी पावसाने जिल्ह्यात धुवांधार फलंदाजी केली. या पावसामुळे शहरातील मुख्य रस्त्यांवर पाणी साचले असून नागरिकांना रेनकोट आणि छत्र्या बाहेर काढाव्या लागल्या आहेत. जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा वाढण्यास या पावसाने मदत होणार आहे. दरम्यान, २३ जुलैपर्यंत विदर्भात असाच मध्यम ते जोरदार पाऊस पडण्याची शक्यता प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. पावसाचा जोर पाहता, आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला असून, जलाशयांजवळ न जाण्याचे आणि अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन केले आहे. अनेक सखल भागात पाणी साठल्याचे व्हिडीओ समोर आले आहे. महापालिकेच्या स्वच्छता विभागाने नाल्यांची सफाई केली की नाही अशी विचारणा नागरिकांनी केली आहे.

# अलंकार मार्केट मध्ये लागली आग,लाखोंचे नुकसान

## जोशी सायकलच्या गोदामात दूसऱ्या मजल्यावर आग

प्रतिनिधी 22 जुलै



**अकोला :** अलंकार मार्केट परिसरातील जोशी सायकलच्या गोदामाला मंगळवारी भीषण आग लागल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या आगीमध्ये गोदामातील लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले असून मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आग वेळेत आटोक्यात आली असून पुढील मोठा अनर्थ टळला आहे.

अलंकार मार्केटमधील जोशी सायकल् या प्रसिद्ध दुकानाच्या दुसऱ्या मजल्यावर असलेल्या गोदामात अचानक धुमाकूळ घालत आगीने रौद्ररूप धारण केले. दुसऱ्या मजल्यावरून धुराचे प्रचंड लोट बाहेर पडत असल्याचे प्रत्यक्षदर्शींच्या लक्षात आले. गोदामात सायकली, प्लास्टिकचे साहित्य, रबर आणि सुटे भाग मोठ्या प्रमाणात साठवले असल्याने आगीने काही वेळातच भडका घेतला. गोदामातून धूर आणि आगीच्या ज्वाला निघत असल्याचे दिसताच स्थानिक नागरिक व व्यापाऱ्यांनी तात्काळ अग्निशमन दलाला माहिती दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून अग्निशमन दलाच्या गाड्या तत्काळ घटनास्थळी दाखल झाल्या. मार्केटमधील अरुंद जागा आणि धुराचे साम्राज्य यांमुळे सुरुवातीला आगीवर नियंत्रण मिळवण्यात अडचणी येत होत्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी चारही बाजूंनी पाण्याचा मारा करत अत्यंत सतर्कतेने आणि अथक प्रयत्नांनंतर आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवले. दुसऱ्या मजल्यावरील गोदामात नवीन सायकलींचे बॉक्स, महागडे स्पेअर पार्ट्स आणि रबरी साहित्य ठेवलेले होते. आगीच्या या तांडवात गोदामातील बहुतांश माल जळून खाक झाला आहे. प्राथमिक अंदाजानुसार यात लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

# शेतकरी कर्जमुक्ती; जिल्ह्यातील 63 हजार 888 कर्जखात्यांचा डेटा पोर्टलवर !

## आधार व अॅग्रीस्टॅक नोंदणीशिवाय लाभ अशक्य

प्रतिनिधी 22 जुलै

**अकोला :** राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ ची अकोला जिल्ह्यातील अंमलबजावणी निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे. पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्यासाठी जिल्ह्यातील ६३ हजार ८८८ कर्जखात्यांची माहिती पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून, प्रशासनाने प्रक्रियेला वेग दिला आहे. यामध्ये अकोला-वाशीम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची २९ हजार ८९६, तर राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकांची ३३ हजार ९९२ कर्जखाती अपलोड करण्यात आली आहेत.

दरम्यान, या योजनेचा लाभघेण्यासाठी आधार क्रमांक जोडणी आणि अॅग्रीस्टॅक नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे.

त्यामुळे अद्याप नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांनी विलंब न करता ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे. प्रशासनाच्या मते, सर्व प्रक्रिया पूर्ण होताच पात्र शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचा मार्ग मोकळा होणार असून, हजारो कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. राज्य शासनाने कर्जमुक्तीची घोषणा केल्यानंतर शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# रेल्वे स्टेशन चौकातील कारवाई प्रकरणी न्यायालयाचा मनपाला झटका

प्रतिनिधी 22 जुलै




**अकोला:** अकोला महानगरपालिकेने १३ फेब्रुवारी रोजी रेल्वे स्टेशन चौकातील च्न्यू क्वालिटीज् हॉटेलवर केलेली कारवाई आता वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. या प्रकरणी अकोला जिल्हा न्यायालयाने अकोला महानगरपालिकेला मोठा झटका दिला आहे. न्यायालयाने मनपाला कारवाईपासून रोखत, संबंधित जागेवर टीन शॉप उभारण्यास आणि ताबा कायम ठेवण्यास मंजुरी दिली आहे.

अकोला मनपाच्या अतिक्रमण विभागाने लीज मुदत संपल्याचे कारण देत १३ फेब्रुवारी रोजी रेल्वे स्टेशन चौकातील अनधिकृत बांधकामांवर बुलडोझर चालवला होता. मात्र, या कारवाईविरोधात याचिकाकर्ते रियाज अहमद आणि शब्बीर अहमद यांनी अकोला जिल्हा न्यायालयात दाद मागितली होती. या प्रकरणावर ८ जुलै २०२६ रोजी सुनावणी करताना जिल्हा न्यायाधीश यांनी महत्त्वाचा निर्णय दिला. न्यायालयाने मनपाला अंतिम निकाल येईपर्यंत याचिकाकर्त्यांच्या ताब्यात हस्तक्षेप करण्यास, त्यांना बेदखल करण्यास किंवा तात्पुरते टीन शेड दुकान बनवण्यापासून रोखण्यास मनाई केली आहे. न्यायालयाच्या या आदेशानंतर संबंधित ठिकाणी नोटीस बोर्ड लावून महापालिकेला न्यायालयाच्या अवमानाची कारवाई न करण्याचा इशारा देण्यात आला आहे. १३ फेब्रुवारी रोजी डंका वाजवत केलेल्या कारवाईनंतर आता न्यायालयाच्या या आदेशामुळे अकोला महापालिका प्रशासनाला मोठा दणका बसल्याची चर्चा शहरात सुरू आहे.

# अकोला आगारातून पंढरपूर यात्रेसाठी विशेष गाड्या सज्ज

प्रतिनिधी 22 जुलै

**अकोला:** पंढरपूर आषाढी यात्रेसाठी अकोला एसटी आगाराने भाविकांसाठी विशेष बसेसचे नियोजन केले आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी आगारातून तब्बल ५० विशेष बसेस पंढरपूरसाठी रवाना केल्या जात आहेत. प्रवाशांच्या मागणीनुसार या बसेस सोडल्या जाणार आहे.

पंढरपूर आषाढी एकादशीनिमित्त अकोला एसटी आगाराचे आगार व्यवस्थापक प्रवीण पिसोडे यांनी भाविकांसाठी विशेष वाहतूक व्यवस्थेची माहिती दिली. आत्तापर्यंत अकोला बस स्थानकावरून ४९ फेऱ्यांद्वारे सुमारे २,२०० भाविकांनी पंढरपूरचा प्रवास केला आहे. एकादशीपर्यंत ५० बसेस पंढरपूरमध्ये मुक्कामी पोहोचतील असे नियोजन करण्यात आले आहे. या प्रवासात एसटी महामंडळाच्या सर्व सवलती लागू असून, पूर्ण तिकीट ९७० रुपये, तर महिलांसाठी ५० टक्के सवलतीसह ४९० रुपये आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी २४० रुपये भाडे आकारले जात आहे. वारकरी व भाविकांनी या विशेष एसटी सेवेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. आगारातून अनेक भाविकांची पंढरपूर यात्रेसाठी रवानगी करण्यात आली.

# चिंब पावसानं रान झालं आबादानी...

प्रतिनिधी 22 जुलै

**अकोला :** दहा दिवसानंतर मंगळवारी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास वरुणराजाने जिल्ह्यात दमदार एन्ट्री केली. गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने चिंतेत सापडलेल्या बळीराजाला या पावसाने मोठा दिलासा दिला मिळाला असून शेतातील उभ्या पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे. पावसामुळे जिल्हाभरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा समाधानाचे हास्य फुलले असून खरीप हंगामाबाबत नव्याने आशा निर्माण झाली आहे. जिल्ह्यात सुरुवातीला चांगला पाऊस झाल्यानंतर काही दिवस पावसाने ओढ दिली होती. त्यामुळे सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आदी खरीप पिकांवर दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले होते. वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर असलेल्या पिकांना पावसाची नितांत गरज होती. शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या असतानाच मंगळवारी सायंकाळानंतर काळ्या ढगांनी गर्दी केली आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाला 7 सुरुवात झाली. या पावसामुळे दिलासा मिळाला. दिवसभर आकाश कोरडे असताना अचानक काळे ढग दाटून आल्यानंतर मंगळवारी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास वादळी वाऱ्यासह सुमारे तासभर जोरदार पाऊस बरसत असल्याने रस्ते वाहतूक प्रभावित झाली होती. शहरातील काही नाल्यांमधून घाण पाण्याचा प्रवाह रस्त्यावर आल्याने वाहनधारकांना वाहने चालविणे कठीण झाले होते. तसेच कार्यालयांसह शाळा सुटण्याच्या वेळेतच पाऊस जोरदार बरसत असल्याने विद्यार्थ्यांसह चाकरमान्यांची तारांबळ उडाली होती. शेतातील कोरडी पडलेली जमीन पुन्हा ओलावली असून पिकांना आवश्यक असलेला जीवनदायी ओलावा मिळाला आहे. त्यामुळे पिकांची वाढ जोमाने होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. पावसामुळे विहिरी, नाले आणि लहान जलस्रोतांमध्येही पाण्याची आवक वाढण्यास सुरुवात झाली आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवस जिल्ह्यात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविली असल्याने खरीप पिकांसाठी ही बाब आणखी लाभदायक ठरणार आहे. सध्या झालेल्या पावसामुळे पिकांना मोठे जीवदान मिळाले असून बळीराजाच्या आशा पुन्हा एकदा पल्लवित झाल्या आहेत.

# नाल्यात मृतक अर्भक वाहून आले

प्रतिनिधी 22 जुलै

अमरावती : आज अमरावतीत पाऊस आल्याने पावसाने भरलेल्या नाल्यात ५ ते ६ महिन्यांचे मृत अवस्थेत अर्भक वाहून आले. या घटनेमुळे अमरावती शहरात खळबळ उडाली असून महापालिका प्रशासन व पोलीस विभाग घटनास्थळी दाखल झाला होता.

प्राप्त माहितीनुसार लक्ष्मी नगर परिसरातील एका नाल्यातून मृत असलेला अर्भक बाहेर काढण्यात आला.

अर्भ क पाहताच, परिसरातील रहिवाशांनी डायल ११२ वर फोन केला. माहिती मिळताच, गाडगे नगरचे पोलीस निरीक्षक (क्कद्ब) गोरखनाथ जाधव आपल्या पथकासह घटनास्थळी दाखल झाले. अर्भक ताब्यात घेण्यात आला, पंचनामा करण्यात आला आणि शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. मृत अर्भकाची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे; त्याच्या आईचाही शोध घेतल्या जात आहे. . या घटनेमुळे लक्ष्मी नगर परिसरात मोठी खळबळ उडाली असून, चर्चा आणि तर्कवितर्कांना सुरुवात झाली आहे.

# संतप्त महिला शेतकऱ्याची विहीर चोरीला गेल्याची नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात तक्रार

प्रतिनिधी 22 जुलै



**नांदगाव पेठ:** अमरावती जिल्ह्यातील शेवती जहागीर गावातील महिला शेतकऱ्यासहित तीन शेतकऱ्यांच्या शासकीय योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या विहिरी प्रत्यक्ष शेतात दिसून येत नसल्याचा आरोप करत संतप्त शेतकऱ्यांनी मंगळवारी नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात विहीर चोरी केल्याची तक्रार माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश दादा साबळे यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक नांदगाव पेठ त्यांच्याकडे दाखल केली.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. शेतकरी अलका सुभाष समरीत यांनी सन २०२३ मध्ये शासकीय योजनेअंतर्गत त्यांच्या शेतासाठी विहीर मंजूर झाल्याचे कागदोपत्री नमूद असताना प्रत्यक्ष जागेवर विहीर अस्तित्वात नसल्याचा दावा केला आहे. यासंदर्भात माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी पोलीस निरीक्षकांकडे निवेदन सादर केले. या प्रकरणात ग्राम रोजगार सेवकापासून गटविकास अधिकारी स्तरापर्यंतच्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. शासकीय निधी मंजूर झाल्याचे नोंदींमध्ये दिसत असले तरी प्रत्यक्षात काम झाले आहे का, याची स्थळ पाहणी करून पडताळणी करावी, तसेच निधीचा गैरवापर झाला असल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

यावेळी प्रकाश साबळे यांनी प्रशासनावर टीका करताना सांगितले की, महिला शेतकऱ्यांच्या सन्मान आणि सहभागाबाबत शासन धोरणे जाहीर होत असतानाही प्रत्यक्षात जिल्हा प्रशासन याबाबत उदासीन व अस्ववेदनशील असल्याचे मत सुद्धा प्रकाश साबळे यांनी व्यक्त केले. या प्रकरणाकडे लक्ष वेधण्यासाठी प्रकाश साबळे, सुनील राणा आणि बंडू डकरे यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या माध्यमातून संबंधित शेतकऱ्यांच्या अडचणी प्रशासनासमोर मांडण्यात आल्या.

# शासकीय जमिनीवरील अतिक्रमण उच्च न्यायालयाचा आदेशा

प्रतिनिधी 22 जुलै

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील शेरवाडी-शेलूवेताळ येथील गट क्रमांक ८७ व ८८ मधील शासकीय जमिनीवरील कथित अतिक्रमण प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. न्यायमूर्ती रोहित डब्ल्यू. जोशी यांनी रिट याचिका क्रमांक ६१२१/२०२५ फेटाळून लावत अकोला जिल्हाधिकारी तसेच अमरावती विभागाच्या अतिरिक्त आयुक्तांनी दिलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. त्यामुळे संबंधित शासकीय जमीन अतिक्रमणमुक्त करून शासनाचा ताबा परत घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राजू वासुदेव सदार व अन्य यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या २३ जानेवारी २०२४ रोजीच्या आदेशाविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती. या आदेशानुसार गट क्रमांक ८७ व ८८ मधील शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटविण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यापूर्वी याचिकाकर्त्यांनी अमरावती विभागाच्या अतिरिक्त आयुक्तांकडे केलेले अपीलही फेटाळण्यात आले होते. याचिकाकर्त्यांनी त्यांच्या मालकीच्या गट क्रमांक ८५ व ८६ आणि शासकीय गट क्रमांक ८७ व ८८ यांची संयुक्त मोजणी न करता अतिक्रमणाचा निष्कर्ष काढल्याचा दावा केला होता. मात्र, न्यायालयाने स्पष्ट केले की, संबंधित जमीन शासकीय असल्याच्या बाबीवर याचिकाकर्त्यांचा मालकी हक्काचा दावा नाही. त्यामुळे शासनाला स्वतःच्या जमिनीचा ताबा परत घेण्याचा अधिकार असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.

■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135